## वरोरा न.प.द्वारा आयोजित स्वच्छता सर्वेक्षण-२०१८ स्पर्धेत रासेयोचा सहभाग





वरोरा शहरातील स्वच्छता विषयी नागरिकांचे मते प्रतिक्रिया जाणून घेताना रासेयो स्वयंसेवक




शहरातील स्वच्छता विषयी नागरिकांचे मते प्रतिक्रिया जाणून घेताना नगर परिषदेचा फलक

# स्वच्छता सर्वेक्षण-२०१८

## अहवाल

भारत सरकारच्या गृहनिर्माण व कार्य मंत्रालय द्वारा स्वच्छ सर्वेक्षण २०१८ ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्वच्छ स्पर्धेत संपूर्ण भारतातील ४०४१ शहरांनी सहभाग नोंदविला होता. भारतातील विविध शहरात स्वच्छतेप्रती जाणीव जागृती निर्माण व्हावी. शहरातील साधी रोगांना आला बसावा या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित केली होती. या स्वच्छ स्पर्धेत वरोरा नगर परिषदेने सहभाग घेतला. त्याचाच एक भाग म्हणून वरोरा पातळीवर विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यात स्वच्छता जनजागर रॅली, स्वच्छता रॅली, स्वच्छता विषयी नागरिकांचे मते आदी वरोरा नगरपरिषदेद्वारा शहरातील नागरिकांच्या वरोराच्या सद्यस्थितीतील मते किंवा प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी शहर स्तरावर सर्वेक्षण घेण्यात आले. या सर्वेक्षण कार्यक्रमात शहरातील १२ वार्डाचा समावेश करण्यात आला.१२व१३जाने.२०१८ ला २०१८या १२ वार्डात प्रत्येकी ६ स्वयंसेवक याप्रमाणे महाविद्यालयातील रासेयो च्या ७२ स्वयंसेवकांनी ६६० नागरिकांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यात मुलाखती घेतांना विशेषतः मोबाइलचा वापर करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या या कार्याबद्दल नगरपरिषद वरोऱ्याचे नगराध्यक्ष अहतेशाम अली, मुख्याध्याधिकारी श्री. सुनिल बल्लाळ व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.आर. पाण्डेय यांनी अभिनंदन केले. या सर्वेक्षण कार्यासाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. तानाजी माने व रासेयो सहकार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक लोणकर यांचे मार्गदर्शन लाभले.

## २५ जानेवारी २०१८

### श्रमदान





राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने प्रजासत्ताक दिनाच्या तयारी निमित्ताने महाविद्यालयाच्या परिसरात श्रमदान घेण्यात आले. या श्रमदानात परिसरातील प्लॉस्टीक निर्मूलन, चुन्याच्या सहाय्याने मैदानाची आखणी करण्यात आली. तसेच २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्य आयोजित विविध कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचा सक्रिय सहभाग घेतला

# २३ फेब्रुवारी २०१८

## वार्षिक समारोप समारंभ




प्रास्ताविक करताना कार्यक्रम अधिकारी प्रा. तानाजी माने



महाविद्यालयाचा गौरव करताना मा. सुनिल बल्लाळ




कार्यक्रम प्रसंगी मत मांडताना मा. सुनिल बल्लाळ




कार्यक्रम प्रसंगी मत मांडताना प्राचार्य डॉ.बी.आर.पाण्डेय

# २३ फेब्रुवारी २०१८

## वार्षिक समारोप समारंभ

## अहवाल

लोकमान्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वार्षिक समारोप कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २३ फेब्रुवारी २०१८ रोज शुक्रवारला करण्यात आले. या वार्षिक समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.आर. पाण्डेय होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून वरोरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मा. सुनिल बल्लाळ होते. या कार्यक्रमात मांडवघोराड येथे पार पाडलेल्या विशेष शिबिरात उल्लेखनीय सहभाग नोंदवला. त्या स्वयंसेवकांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. सत्र २०१७-१८ चा राष्ट्रीय सेवा योजनेचा उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून कु. कल्याणी बरडे चा गौरव करण्यात आला. विशेष शिबिरातील सांस्कृतिक कार्यक्रमात सादर केलेल्या 'शोषणखड्याचे महत्व' या लघुनाटिकेला उत्कृष्ट लघुनाटिकेचा पुरस्कार देण्यात आला. तसेच 'मोबाइलचे साईड इफेट' या लघुनाटिकेत अभिनय केलेल्या कु. प्रितम निमकरला उत्कृष्ट अभिनयाचा पुरस्कार देण्यात आला. तसेच उत्कृष्ट गायनाचा पुरस्कार कु. प्रगती गुडगे, उत्कृष्ट एकल नृत्याचा पुरस्कार कु. स्वाती ठाकरे आणि उत्कृष्ट समुह नृत्याचा पुरस्कार 'कोळी नृत्याला' देण्यात आला.


या वार्षिक समारोप कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक मा. श्री. सुनिल बल्लाळ यांनी विद्यार्थ्यांना रचनात्मक कार्याचे शिक्षण देण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेची अत्यंत महत्वपूर्ण आहे, असे विचार मांडले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. बी.आर. पाण्डेय यांनी महाविद्यालयीन तरूणांवर श्रमसंस्कारचे साधन म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्वपूर्ण स्थान आहे, असे विचार मांडले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. तानाजी माने यांनी केले. तर सुत्रसंचालन रासेयो सहकार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक लोणकर यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि रासेयो स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विशेष शिबिर अहवाल

## मांडवघोराड येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर

वरोरा येथील लोकमान्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे सात दिवसीय विशेष शिबिराचे आयोजन मौजा मांडवघोराड येथे करण्यात आले. या विशेष शिबिराचा कालावधी दि. २४ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०१७ हा होता. हे विशेष शिबिर 'ग्रमोन्नतीकरिता युवा शक्ती शिबिर' या संकल्पनेवर आधारित होते. या विशेष शिबिरात ग्रामोन्नतीकरिता व युवकांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सात दिवसीय विशेष शिबिरात ७५ स्वयंसेवकांचा सहभाग होता.




### विशेष शिबिर कार्यक्रम पत्रिका

## १.उद्घाटन कार्यक्रम :-





विशेष शिबिर उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर व रासेयो गीत सादर करतांना स्वयंसेवक



विशेष शिबिर उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थित स्वयंसेवक व गावकरी

## १. उद्‌घाटन कार्यक्रम अहवाल

राष्ट्रीय सेवा योजनाच्या विशेष शिबिराचा उद्‌घाटन कार्यक्रम दि. २४ डिसेंबर २०१७ रोज रविवारला दुपारी ३.०० वाजता घेण्यात आला. या उद्‌घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.आर.पाण्डेय हे होते. तर उद्‌घाटक म्हणून सामाजिक कार्यकर्त्या सौ. सुवर्णरेखाताई पाटील यांची उपस्थिती होती. तसेच या उद्‌घाटन कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून मा. प्रा. श्रीकांतजी पाटील (अध्यक्ष,लोक शिक्षण संस्था, वरोडा), मा. श्री. श्रीकृष्णाजी घड्याळपाटील (कार्यवाह,लोक शिक्षण संस्था, वरोडा), चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या सदस्या मा. डॉ. आसावरी देवतळे (सदस्या, जिल्हा परिषद, चंद्रपूर) यांची उपस्थिती होती. तसेच या उद्‌घाटन कार्यक्रमाला मांडवघोराडच्या सरपंच सौ. रेखाताई रासेकर, ग्रामसेवक श्री कोडापे, ग्रामपंचायत सदस्य श्री. अनिल झाडे यांची उपस्थिती होती. त्याचबरोबर या कार्यक्रमाला लोकमान्य महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद आणि मांडवघोराड येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्‌घाटन कार्यक्रमाचे संचालन रासेयो सहकार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक लोणकर तर प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. तानाजी माने यांनी केले.

## २. श्रमदान :-



श्रमदानाचे उद्घाटन करतांना डॉ. बी.आर.पाण्डेय



श्रमदान करतांना श्री. बापुजी नन्नावरे





श्रमदान करतांना रासेयो स्वयंसेवक



श्रमदान करतांना रासेयो स्वयंसेवक



अतिक्रमण काढण्यासंबंधी चर्चा करतांना गावकरी

## २. श्रमदान अहवाल :-

या सातदिवसीय विशेष शिबिरात ७५ स्वयंसेवक व गावकऱ्यांच्या सहकार्यातून गावांतील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याला प्राध्यान्य देण्यात आले. तसेच गावांतील मुख्य रस्त्यावरील सांडपाण्याची व्यवस्था लावण्यासाठी रस्त्याच्या बाजूला नाली खोदकाम करण्यात आले. या सातदिवसीय विशेष शिबिरात श्रमदानाच्या माध्यमातून ३०० मीटर लांबी व ०.९० से.मी. रूंदीची नाली खोदण्यात आली. या नालीचे एकुण श्रममुल्य ६७,५००/- रूपये तसेच गावातील ०५ घरांमध्ये शोषखड्डे श्रमदानाच्या माध्यमातून खोदण्यात आले. या शोषखड्ड्यांचे श्रममुल्य ३,७५०/- रूपये इतके आहे.

## ३. रोगनिदान शिबिर :-





रूग्णांची तपासणी करतांना डॉ. विशाल हिवरकर व डॉ. आशुतोष झाडे



रूग्णांची तपासणी करतांना डॉ. प्रशांत पिंपळकर व स्वयंसेवक




रोगनिदान शिबिरात सहभागी गावकरी

## ३. रोगनिदान शिबिर अहवाल :-

या सातदिवसीय विशेष शिबिराच्या माध्यमातून मांडवघोराड या गावातील लोकांमध्ये आरोग्याच्यादृष्टीने जाणीवजागृती निर्माण व्हावी तसेच गावांतील लोकांचे आरोग्यविषयक जीवनमान उंचावावे या उद्देशाने दि. ०७/१२/२०१७ रोज बुधवारला रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या रोगनिदान शिबिरासाठी वरोऱ्यातील प्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ. विशाल हिवरकर, दंतरोगतज्ञ डॉ. आशुतोष झाडे व जनरल फिजिशियन डॉ. प्रशांत पिंपळकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या रोगनिदान शिबिरात रूग्णांच्या मोफत तपासणीबरोबरच त्यांना मोफत औषधी वाटप करण्यात आले. या रोगनिदान शिबिरात ३०० रूग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. या रोगनिदान शिबिरात रूग्णांची तपासणी व औषधी वाटप यांचे एकुण मुल्य १६,८४०/- रूपये इतके आहे.

## ४. पशुचिकित्सा शिबिर :-




पशुचिकित्सा शिबिरात उपस्थित मान्यवर



जनावरांची तपासणी करतांना पशुवैद्यकीय अधिकारी



जनावरांची तपासणी करतांना पशुवैद्यकीय अधिकारी व रासेयो स्वयंसेवक

## ४. पशुचिकित्सा शिबिर अहवाल

या सातदिवसीय विशेष शिबिरात मांडवघोराड गावातील शेतकऱ्यांमध्ये पशुधनाच्या आरोग्याच्यादृष्टीने जाणीव जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने दि. २८/१२/२०१७ रोज गुरूवारला एकदिवसीय पशुचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले. या पशुचिकित्सा शिबिराला पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी-२ कोसरसार, पं.स.वरोराचे पशुधनविकास अधिकारी डॉ. एस.पी.कळमकर, डॉ. बी.ए.आकनुरवार, डॉ. एम.एल.बोरकर, डॉ. पी. एस.पोफडी यांचे मार्गदर्शन लाभले. या पशुचिकित्सा शिबिरात जनावरांच्या खच्चीकरण, गर्भतपासणी, वंधत्व तपासणी इ. तपासण्या करण्याबरोबरच लसीकरण व औषधोपचार करण्यात आले. या पशुचिकित्सा शिबिरात २१३ जनावरांच्या तपासण्या व औषधोपचार करण्यात आले. पशुचिकित्सा शिबिरात जनावरांची तपासणी व औषधोपचार याचे एकुण मुल्य १४,८६०/- रूपये इतके आहे.

# ५. बौद्धिक कार्यक्रम :–







१ **‘कृषीविषयक मार्गदर्शन’** या विषयावर मार्गदर्शन करताना **श्री.मारोती वरभे**

२ **‘बँकांचे ग्रामीण समाजाच्या विकासात योगदान’**या विषयावर मार्गदर्शन करताना **श्री. गजानन डंभारे**







३ **‘नाटक व मराठी रंगमंच’**या विषयावर मार्गदर्शन करताना **श्री.प्रमोदजी भुसारी**

४ **‘पत्रकारिता आणि समाज’**या विषयावर मार्गदर्शन करताना **श्री.बन** (पत्रकार)




५ **'युवक व व्यक्तीमत्व विकास'**या विषयावर मार्गदर्शन करताना **प्रा.रूपेश घागी**



**६'युवकांना सरकारी योजनांचे मार्गदर्शन व संधी'**या विषयावर मार्गदर्शन करताना**श्री. विद्याधर वैद्य**

## ५. बौद्धिक कार्यक्रम अहवाल :-

या सातदिवसीय विशेष शिबिरात स्वयंसेवकांचा बौद्धिक, मानसिक विकास व्हावा या दृष्टीने रोज दुपारी २.०० ते ४.३० या वेळेत बौद्धिक सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या बौद्धिक सत्रात दिनांक २५/१२/२०१७ रोज सोमवारला श्री.मारोती वरभे (मंडळ कृषी अधिकारी बल्लारशाह) यांचे 'कृषी विषयक मार्गदर्शन' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. दि. २६/१२/२०१७ रोज बुधवारला श्री. गजानन डंभारे (प्रादेशिक सहाय्यक व्यवस्थापक, महिंद्रा फाय. नागपूर) यांचे 'बँकांचे ग्रामीण समाजाच्या विकासात योगदान' या विषयांवर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. दि. २८/१२/२०१७ रोज गुरूवारला मा.श्री.प्रमोदजी भुसारी (उपविभागीय अधिकारी, वरोरा) यांचे 'नाटक व मराठी रंगमंच' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. तसेच दैनिक देशोन्नतीचे पत्रकार श्री. बन यांचे पत्रकारिता आणि समाज या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. दि. २९/१२/२०१७ रोज शुक्रवारला श्री. विद्याधर वैद्य (कार्यक्रम समन्वयक, राष्ट्रीय ग्रामीण जीवोन्नती अभियान) यांचे 'युवकांना सरकारी योजनांचे मार्गदर्शन व संधी' या विषयावर आणि प्रा.रूपेश घागी (संस्थापक अध्यक्ष दिशा एज्यूपाईंट, वरोरा) यांचे 'युवक व व्यक्तीमत्व विकास' या विषयांवर व्याख्यानाचे आयोज करण्यात आले.

## ६. सांस्कृतिक कार्यक्रम :–



समुह नृत्य सादर करतांना रासेयो स्वयंसेवक



लघुनाटिका सादर करतांना रासेयो स्वयंसेवक



समुह नृत्य सादर करतांना रासेयो स्वयंसेवक



बाबा आमटेवरील लघुनाटिका सादर करतांना रासेयो स्वयंसेवक



स्माजप्रबोधनपर किर्तन सादर करतांना शरद महाराज वैद्य



योगासमुह नृत्य सादर करतांना रासेयो स्वयंसेवक



लघुनाटिका सादर करतांना रासेयो स्वयंसेवक



गीतगायन कार्यक्रमात सहभागी रासेयो स्वयंसेवक

## ६. सांस्कृतिक कार्यक्रम :-

समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ठ चालिरिती, रूढी, प्रथा व परंपरा याविषयी जनजागृती व्हावी या उद्देशाने सातदिवसीय विशेष शिबिरात दैनंदिन सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दिनांक २४/१२/२०१७ रोज रविवारला सांस्कृतिक कार्यक्रमात मांडवघोराडातील भजनमंडळातर्फे भजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सांस्कृतिक कार्यक्रमात रासेयो कलापथकाकडून लघुनाटिका, लोकगीते व एकांकीका सादर करण्यात आल्या. त्यात 'मोबाईलचे दुष्परिणाम' हागणदारी मुक्त नाव', 'शोषखड्डे अभियान' शेतकऱ्यांच्या आत्महत्या, हुंडाबळी, स्त्रीभ्रुण हत्या, स्वच्छता आदी विषयावर लघुनाटिका सादर करण्यात आल्या. तसेच समाजप्रबोधनात्मक विविध समुह नृत्य सादर करण्यात आले. दिनांक २६/१२/२०१७ रोज मंगळवारला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मांडवघोराडच्या लहान मुलांचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. दि. २७/१२/२०१७ रोज बुधवारला श्री. शरद महाराज वैद्य यांच्या समाजप्रबोधनात्मक व राष्ट्रभक्तीवर आधारित किर्तनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

## ७. मा. आमदार बाळूभाऊ धानोरकरांची विशेष शिबिरास भेट





श्रमदानाच्या माध्यमातून केलेल्या कामाची पाहणी करतांना व मत मांडतांना आमदार बाळुभाऊ धानोरकर





श्रमदान करतांना आमदार बाळुभाऊ धानोरकर, प्राचार्य डॉ.बी.आर.पाण्डेय, गावकरी व रासेयो स्वयंसेवक

## ७. मा. आमदार बाळूभाऊ धानोरकरांची विशेष शिबिरास भेट

या सातदिवसीय विशेष शिबिराला वरोरा–भद्रावती विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार मा. बाळूभाऊ धानोरकर यांनी दि. २९/१२/०१७ रोज शुक्रवारला भेट दिली.मा. आमदारांनी राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयंसेवकांनी श्रमदानाच्या माध्यमातून केलेल्या नालीखोदकामची पाहणी केली तसेच त्यांनी स्वतः श्रमदान केले. त्यांनी विशेष शिबिर व श्रमदानासंबंधी असे मत व्यक्त केले की, युवकांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर खुप उपयुक्त आहे. देशाच्या विकासासाठी रचनात्मक कार्यक्रम युवकांचा वर्ग घडविण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून केले जाते. तसेच ग्रामीण भागाचा विकासासाठी लोकसहभाग अत्यंत आवश्यक आहे. मा. आमदार साहेबांनी स्वयंसेवकांनी श्रमदानाच्या माध्यमातून केलेले कार्ये पूर्णत्वास नेण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची घोषणा केली.

## ८. समारोप कार्यक्रम :-



संचालन करतांना रासेयो सहकार्यक्रम अधिकारी डॉ. लोणकर



प्रास्ताविक करतांना कार्यक्रम अधिकारी प्रा. तानाजी माने



गावकऱ्यांचे मनोगत



रासेयो स्वयंसेवकांचे मनोगत





**समारोप कार्यक्रमप्रसंगी मत मांडतांना मा. ना. हंसराजजी अहिर, उपस्थित मान्यवर, गावकरी व रासेयो स्वयंसेवक**

## ८. समारोप कार्यक्रम अहवाल :-

राष्ट्रीय सेवा योजनाच्या विशेष शिबिराचा समारोपीय कार्यक्रमाचे आयोजन दि. ३०/१२/२०१७ रोज शनिवारला दुपारी ४.०० वाजता करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.आर.पाण्डेय हे होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून मा. नामदार हंसराजजी अहिर (केंद्रीय गृहराज्यमंत्री, भारत सरकार), मा. प्राचार्य अनिलजी डोंगरे(उपाध्यक्ष, लोक शिक्षण संस्था, वरोडा), मा. डॉ. मिलींदजी देशपांडे (कार्यवाह, लोक शिक्षण संस्था, वरोडा), मा. नितीन मत्ते (माजी सदस्य जि. प. चंद्रपूर), सौ. रेखाताई रासेकर (सरपंच मांडवघोराड) व श्री. अनिल झाडे (सदस्य, ग्रा. प. मांडवघोराड) यांची उपस्थिती होती. मा. नामदार हंसराजजी अहिर यांनी आपल्या भाषणातून रा.से.यो. स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. या विशेष शिबिराच्या माध्यमातून तरूणांना गावातील समस्या, चालीरिती व समस्या समजण्यास मदत होते, असे विचार मांडले. तसेच स्वयंसेवकांच्या श्रमदानाच्या माध्यमातून केलेले कार्य पूर्णत्वास नेण्याचे आश्वासन दिले. या विशेष शिबिराच्या समारोप कार्यक्रमास लोकमान्य महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी वृंद आणि मांडवघोराड येथील गावकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या विशेष शिबिराच्या माध्यमातून १,०२,९५०/- (एक लाख दोन हजार नऊशे पन्नास रू.) इतके मुल्याचे काम करण्यात आले.

# लोकमान्य महाविद्यालय, वरोरा जि. चंद्रपूर
# राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल

## नियमित कार्यक्रम अहवाल व विशेष शिबिर अहवाल

## सत्र २०१८–१९


डॉ. जयश्री शास्त्री
प्रभारी प्राचार्य
लोकमान्य महाविद्यालय,
वरोरा जि. चंद्रपूर

प्रा. तानाजी माने
रासेयो. कार्यक्रम अधिकारी
लोकमान्य महाविद्यालय,
वरोरा जि. चंद्रपूर

डॉ. दीपक लोणकर
रासेयो. सहकार्यक्रम अधिकारी
लोकमान्य महाविद्यालय,
वरोरा जि. चंद्रपूर

**परिशिष्ट – ६**

**राष्ट्रीय सेवा योजना**

**रासेयोचे त्रैमासीक/अर्धवार्षिक/वार्षिक अहवाल सादर करण्याचा नमुना**

## अ) सामान्य माहिती

| | | | |
|---|---|---|---|
| १) | महाविद्यालयाचे नाव | : | लोकमान्य महाविद्यालय, वरोरा |
| २) | संपूर्ण पत्ता | : | अभ्यंकर वार्ड, वरोरा जि. चंद्रपूर |
| | (दुरध्वनी क्र., फॅक्स इ. मेलसह) | : | ०७१७६–२८२०५३<br>Lokmanya_mahavidyalaya@rediffmail.com |
| ३) | प्राचार्याचे नांव | : | डॉ. जयश्री प्रकाश शास्त्री |
| | दुरध्वनी क्रमांक (का) | : | ०७१७६–२८२०५३ |
| | भ्रमणध्वनी क्र. | : | ९१७२९९००७९ |
| | ई–मेल | : | jayashrishastri7@gmail.com |

४) कार्यक्रम अधिकाऱ्यांची नावे — दुरध्वनी क्रमांक — भ्रमणध्वनी

१) प्रा. तानाजी संभाजी माने — ९७६५२०३८६३

२) डॉ. दीपक पांडुरंग लोणकर — ९४२३४१९४३७

५) रासेयो सल्लागार समिती

१) अध्यक्ष डॉ. जे.पी.शास्त्री — ९१७२९९००७९

२) सचिव प्रा. तानाजी संभाजी माने — ९७६५२२३८६३

३) सदस्य सुनिल बल्लाळ(मुख्याधिकारी) न.प.वरोरा — ९६८९३३५३६९

४) सदस्य डॉ. दीपक पांडुरंग लोणकर — ९४२३४१९४३७

५) सदस्य प्रा. श्रीकांत निरंजन पुरी — ७६२०५५८९०४

६) सदस्य प्रा. रविंद्र बापुराव शेंडे — ९७६५९२६४५४

७) सदस्य श्री. तुषार प्रभाकर उराडे — ७८७५१७१५६४

८) सदस्य कु. अर्पिता अतुल भिसे — ८७८८९१७३५३

६) सल्लागार समितीच्या अहवाल काळातील बैठक संख्या तारखेसह २ (२४/९/२०१८ व ३०/१२/२०१८)

७) रासेयो पथकाची संख्या व विद्यार्थी संख्या १५०

८) नोंदणी १५०

महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या :

| अ.जा | अ.ज. | इ.मा.व. | खुले | एकुण |
|---|---|---|---|---|
| पु/स्त्री | पु/स्त्री | पु/स्त्री | पु/स्त्री | पु/स्त्री |
| ३/८ | ७/९ | २२/९७ | ०/४ | ३२/११८ |

१) विद्यापीठाने रासेयो मान्यताप्राप्त संख्या १५०

२) रासेयोमध्ये नोंदणी झालेली विद्यार्थी संख्या १५०

एकुण

९) विद्यार्थ्यांकरिता आयोजित प्रबोधन वर्गाविषयी सविस्तर माहिती असेल तर
**महाविद्यालयात दर बुधवारी विद्यार्थ्यांकरीता प्रबोधन वर्गाचे आयोजन केले जाते.**

१०) रासेयो पथकाने दत्तक घेतलेले समुदाय/झोपडपट्टी/कल्याणकारी संस्थेचे नाव व ठिकाण

ठिकाण :

लोकसंख्या : महाविद्यालयापासूनचे अंतर :

११) नियमित रासेयो कार्यक्रम/उपक्रम — महाविद्यालय परिसरात श्रमदान कार्यक्रम शहरात स्वच्छता कार्यक्रम रक्तदान शिबिर

(अ) घेतलेल्या कार्यक्रम/उपक्रम रासेयो पथकाने आयोजित केलेल्या उपक्रमाबद्दल ४ ते ५ ओळीत वर्णन करा

(जसे : सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या, सहयोगी संस्था/संघठन कार्यक्रमांना यशस्वी करण्यात सहभागी घटक)

**महाविद्यालयात दर बुधवारी विद्यार्थ्यांकरीता प्रबोधन वर्गाचे आयोजन, वृक्षारोपण, स्वच्छता मोहिम,राष्ट्रीय सेवा योजना दिन, म.गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती, इ.कार्यक्रम**

**(ब) विशेष शिबिर कार्यक्रम**

(१) अहवाल काळात महाविद्यालयीन रासेयो पथकाने शिबिर आयोजित केले होते काय? **होय**

(२) होय, असल्यास

(अ) शिबिरार्थी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | : | पुरूष- ३१ | स्त्री- ४४ | एकुण- ७५ |
| गैरविद्यार्थी | : | पुरूष- ०६ | स्त्री- ०६ | एकुण- १२ |
| शिक्षक | : | पुरूष- ०४ | स्त्री- ०४ | एकुण- ०८ |

(ब) शिबिराचे ठिकाण : वनोजा

(क) शिबिराचा तारखेसहीत कालावधी : **१/०१/२०१९ ते ७/०१/२०१९**

(ड) शिबिरादरम्याने राबविलेले कार्यक्रम/उपक्रम (नियमित उपक्रमांप्रमाणे शिबिरादरम्यान राबविलेल्या उपक्रमांविषयी सविस्तर लिहा.)

(टिप : सोबत नियमित व विशेष शिबिरात राबविलेल्या कार्यक्रम/उपक्रमांचे निवडक कृतीपर छायाचित्रे व पेपर कात्रणे पाठवावे तसेच रासेयो सांख्यिकी अहवाल पाठवावा.)

# कार्यक्रम अहवाल

| | |
|---|---|
| १ | नियमित कार्यक्रम अहवाल |
| २ | वृक्षारोपण अहवाल |
| ३ | स्वच्छता अहवाल |
| ४ | रक्तदान शिबिर |
| ५ | विशेष शिबिर |

# अ) नियमित कार्यक्रम अहवाल

वरोरा येथील लोकमान्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सत्र २०१८–२०१९ या शैक्षणिक सत्रातील स्वयंसेवकांची प्रवेश प्रक्रिया जुलै महिन्यात घेण्यात आली. मागील वर्षाचे स्वयंसेवक व नवीन प्रवेशित स्वयंसेवक १५० स्वयंसेवकांचा प्रवेश निश्चित करण्यात आला. या नियमित कार्यक्रमाअंतर्गत सत्र २०१८–२०१९ या संपूर्ण शैक्षणिक सत्रात दर बुधवारी उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात येते. यात युवकांचे दायित्व, व्यक्तिमत्व विकास राष्ट्रांच्या विकासातील युवकांचे योगदान आदी विषयांवर मार्गदर्शन केले जाते. जुलै महिन्यात महाविद्यालयीन स्तरावर मा. प्राचार्याच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठण करण्यात आले.

सत्र २०१८–२०१९ या शैक्षणिक सत्रात गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली चे परिपत्रक, महाविद्यालयाचे विविध कार्यक्रम आणि स्थानिक वरोऱ्यातील विविध राजकिय, सामाजिक, आरोग्य विषयकविभाग व पोलिस विभाग यांच्या सहकार्याने विविध कार्यक्रम राबविले जातात. नियमित कार्यक्रम अहवाल पुढीलप्रमाणे–

| अ. क्र. | दिनांक | कार्यक्रम |
|---|---|---|
| १ | २१ जून २०१८ | आंतरराष्ट्रीय योग दिन |
| २ | ११ जुलै २०१८ | जागतिक लोकसंख्या दिन |
| ३ | ०५ सप्टेंबर २०१८ | शिक्षक दिन |
| ४ | २४ सप्टेंबर २०१८ | राष्ट्रीय सेवा योजना |
| ५ | ०१ ऑक्टोंबर२०१८ | **Sanatory Napking** जनजागृती कार्यक्रम |
| ६ | ०५ ऑक्टोंबर २०१८ | बेरोजगार युवकांसाठी कार्यशाळा |
| ७ | १५ ऑक्टोंबर २०१८ | वाचन प्रेरणा दिन |
| ८ | २६ नोव्हेंबर २०१८ | संविधान दिन |
| ९ | ०६ डिसेंबर २०१८ | महापरिनिर्वाण दिन |
| १० | २५ जानेवारी २०१९ | राष्ट्रीय मतदार दिन |
| ११ | ९ मार्च २०१९ | राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक समारोह कार्यक्रम |

## १.   २१ जून २०१८ – आंतरराष्ट्रीय योगदिन



मार्गदर्शन करतांना कार्यवाह श्री. श्रीकृष्णाजी घड्याळपाटील



मार्गदर्शन करतांना श्री रितेश चंदलवार




योगासनाचे प्रात्यक्षिकबाबत मार्गदर्शन करतांना प्रा. उत्तम देऊळकर

२१ जून जागतिक योग दिनानिमित्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व शारिरिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला वरोऱ्यातील प्रसिद्ध फिजिओथेरिपी तज्ञ श्री रितेश चंदेलवार उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. श्रीकांतजी पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन शारिरीक शिक्षण संचालक प्रा. उत्तम देऊळकर यांनी केले. या कार्यक्रमाला रासेयो स्वयंसेवकाबरोबर वरोऱ्यातील प्रतिष्ठित नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## २.     ११ जुलै २०१८– जागतिक लोकसंख्या दिन



प्रास्ताविक करतांना प्रा. तानाजी माने



मार्गदर्शन करतांना डॉ. जयश्री शास्त्री

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व लोकसंख्या शिक्षण मंडळाच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक लोकसंख्या दिना'निमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ता म्हणून लोक शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मा. अनिलजी डोंगरे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांना लोकसंख्या वाढ, त्यांची कारणे, त्यांचे दुष्परिणाम व त्यावरील उपाययोजना याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

## ३.  ५ सप्टेंबर – शिक्षक दिन




प्रास्ताविक करतांना डॉ. दीपक लोणकर




मार्गदर्शन करतांना कार्यवाह डॉ. मिलींद देशपांडे

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी संघाच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनानिमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ता म्हणून लोक शिक्षण संस्थेचे कार्यवाह मा. डॉ. मिलिंदजी देशपांडे उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपले ध्येय साध्य करण्यासाठी ‘शिक्षणावर’ लक्ष केंद्रीत करण्याची आवश्यकता आहे, या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

## ४. २४ सप्टेंबर २०१८ – राष्ट्रीय सेवा योजना दिन –



प्रास्ताविक करतांना प्रा. तानाजी माने



मार्गदर्शन करतांना सौ. सुवर्णरेखाताई पाटील

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापना दिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ता म्हणून लोकमान्य महाविद्यालय विकास समितीच्या सन्माननीय सदस्या सौ. सुवर्णरेखाताई पाटील उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात ‘सेवेच्या माध्यमातून समाज व राष्ट्रांच्या विकासात रचनात्मक योगदान देता येते’ असे मत मांडले. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांच्या माध्यमातून समाजात स्वच्छतेविषयी व्यापक प्रमाणात जनजागृती घडवून आणता येऊ शकते, असे प्रतिपादन केले. तसेच गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या संदर्भ पत्र क्र. गोवि/रासेयो/४८४/दिनांक १८/०९/२०१८ च्या नुसार राष्ट्रीय सेवा योजना दिवस हा ‘स्वच्छता ही सेवा’ म्हणून साजरा करण्याच्या अनुषंगाने महाविद्यालयाच्या परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. महाविद्यालयाच्या परिसरात प्लॉस्टीक निर्मूलन व गाजर गवत निर्मूलन करण्यात आले.

## ५.    ०१ ऑक्टोंबर – **Sanatory Napking** - जनजागृती कार्यक्रम



महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, लोकसंख्या शिक्षण मंडळ, महिला अध्ययन व सेवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने **‘Sanatory Napking’** जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला भद्रावती येथील सामाजिक कार्यकर्त्या सौ. ममता सारडा याचीं उपस्थिती होती. प्रमुख वक्त्या सौ. ममता सारडा यांनी स्त्रीयांची स्वच्छता, आवश्यकता, घ्यावयाची दक्षता आणि अस्वच्छतेमुळे होणारे आजार या विषयी विद्यार्थिनींना सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच या कार्यक्रमाला उपस्थित महाविद्यालयीन तरूणींना मोफत **Sanatory Napking** चे वाटप करण्यात आले.

## ०६. ०५ ऑक्टोंबर २०१८ – प्लॉस्टीक उद्योग




मार्गदर्शन करतांना श्री मेश्राम




मार्गदर्शन करतांना कार्यवाह डॉ. श्रिनिवास पिलगुलवार

चंद्रपूर येथील सिपेट (**Central Institute of Plastic Engineering and Technology**) व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने लोकमान्य महाविद्यालयात एक दिवसीय ‘प्लॉस्टीक उद्योग’ कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सिपेट ही संस्था भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनातर्फे आयोजित दिनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेअंतर्गत सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कार्य करते. ग्रामीण भागाचा विकास करणे, ग्रामीण भागातील तरूणांना प्रशिक्षित करणे इ. उपक्रम राबविले जातात आणि प्रशिक्षित तरूणांना रोजगार उपलब्ध करून दिला जातो. या एकदिवसीय कार्यशाळेला सिपेट चे श्री. चेतन मेश्राम मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

## ७. १५ ऑक्टोंबर २०१८ – वाचन प्रेरणा दिन



व्यासपीठावरील मान्यवर



आभार करतांना सौ. लिना पुष्पलवार

**म**हाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'वाचन प्रेरणा दिना'निमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ता म्हणून महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. तानाजी माने होते. प्रमुख वक्ता यांनी मानवाच्या बौद्धिक विकासासाठी व अनुभव संपन्नतेसाठी वाचनाची आवश्यकता आहे. मिसाईल मॅन, भारतरत्न डॉ. ए.पी.जी.अब्दुल कलाम यांनी भविष्यकालीन भारताचा आधार स्तंभ असणाऱ्या युवकांना जागृत करण्यात महत्वपूर्ण योगदान दिले आहे, याबाबत आपले विचार मांडले.

## ८. २६ नोव्हेंबर २०१८ – संविधान दिन



प्रास्ताविक करतांना प्रा. तानाजी माने



मार्गदर्शन करतांना डॉ. श्रीनिवास पिलगुलवार

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २६ नोव्हेंबर २०१८ ला संविधान दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. श्रीनिवास पिलगुलवार हे होते. तर प्रमुख वक्ता म्हणून इतिहास विभागप्रमुख डॉ. दीपक लोणकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून तसेच संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे वाचन करून कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ता डॉ. दीपक लोणकर यांनी आपल्या मार्गदर्शनातून संविधानाच्या निर्मितीप्रक्रियेवर प्रकाश टाकला. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. श्रिनिवास पिलगुलवार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात संविधान हे भारतीय जनतेचे जीवन जगण्याचा एक मार्ग बनला आहे, असे मत मांडले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. तानाजी माने यांनी तर आभारप्रदर्शन लिना पुप्पलवार यांनी केले.

१.  ०६ डिसेंबर २०१८- डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन


मार्गदर्शन करतांना प्रा. बबनराव अवघडे



मार्गदर्शन करतांना डॉ. जयश्री शास्त्री

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, मराठी विभाग व ग्रंथालय विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. जयश्री शास्त्री आणि प्रमुख वक्ता प्रा.बबनराव अवघडे (मराठी विभागप्रमुख, आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा) हे होते. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ता प्रा. बबनराव अवघडे यांनी 'आंबेडकरवादी साहित्य' या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.प्रमुख वक्ता प्रा. बबनराव अवघडे यांनी आपल्या मार्गदर्शनात शरद लिंबाळे, लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड, शंकरराव खरात या आंबेडकरवादी साहित्यीकांच्या मराठी साहित्याचा आढावा घेतला. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. जयश्री शास्त्री यांनी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात 'आंबेडकरवादी साहित्याने मराठी विश्वाला समृद्ध करण्याचे काम केले आहे, असे मत मांडले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. शेषराव तराळे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. रजनिगंधा खिरटकर यांनी केले तर आभार सौ. पुष्पलवार यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## २.  २५ जानेवारी २०१९ – राष्ट्रीय मतदार दिन



प्रास्ताकवक करतांना प्रा. तानाजी माने



राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रमास उपस्थित विद्यार्थी

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व निवडणुक विभाग, तहसिल कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने २५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. श्रीनिवास पिलगुलवार हे होते. तर प्रमुख उपस्थिती श्री. दिनकर घोरूडे (नायब तहसिलदार, वरोरा), श्री. पांडे (निवडणुक विभाग, वरोरा) हे होते. या कार्यक्रमाच्या सुरूवातीला राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना मतदानाची शपथ देण्यात आली. या कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित श्री. दिनकर घोरूडे यांनी आपल्या मार्गदर्शनात निवडणुक विभागाकडून नवमतदारांची नोंद करण्यासंबंधी माहिती दिली. मतदार नोंदणी अर्ज मतदारांचे स्थानांतरण झाल्यानंतर मतदार यादीतून नाव वगळण्याची प्रक्रिया, मतदारांचा पत्ता बदलण्याची प्रक्रिया इ. बाबतीत माहिती दिली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. श्रीनिवास पिलगुलवार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून नवमतदारांना मार्गदर्शन केले. भारतीय लोकशाही सुदृढ आणि मजबूत करण्याची जबाबदारी मतदारांची आहे. यासाठी नवमतदारांनी समोर येऊन मतदानाचा अधिकार बजावला पाहिजे. १०० टक्के मतदान होणे ही काळाची गरज आहे, असे मत मांडले. या कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. तानाजी माने यांनी केले तर आभार प्रा. रविंद्र शेंडे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ३.    ०९ मार्च २०१९ – वार्षिक समारोप कार्यक्रम




प्रास्ताविक करतांना प्रा. तानाजी माने




मार्गदर्शन करतांना कार्यवाह श्री. श्रीकृष्णाजी घड्याळपाटील



पुरस्कार देतांना कार्यवाह श्री. श्रीकृष्णाजी घड्याळपाटील



पुरस्कार देतांना डॉ. जयश्री शास्त्री

४. ०९ मार्च २०१९ – **वार्षिक समारोप कार्यक्रम**

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक समारोप कार्यक्रमाचे आयोजन दि. ९ मार्च २०१९ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. जयश्री शास्त्री (प्रभारी प्राचार्य, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा) तर प्रमुख मार्गदर्शक मा. श्रीकृष्णाजी घड्याळपाटील (कार्यवाह, लोकशिक्षण संस्था, वरोडा) हे होते. या कार्यक्रमाच्या सुरूवातीला प्रास्ताविकातून रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. तानाजी माने यांनी शैक्षणिक सत्र २०१८–१९ मधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रम व विशेष शिबिरातील कार्यक्रमाच्या अहवालाचे सविस्तर मांडणी केली. त्यानंतर या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमात उत्कृष्ठ योगदान दिलेल्या स्वयंसेवकांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. त्यात उत्कृष्ठ फलक लेखन, उत्कृष्ठ तबला वादन, उत्कृष्ठ गीत गायन, उत्कृष्ठ अभिनय, उत्कृष्ठ एकल व समूह नृत्य, लघुनाटीका, उत्कृष्ठ संघ व संघनायक आणि उत्कृष्ठ स्वयंसेवक अशी विविध पुरस्कार देण्यात आली.

या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनाचा व्यक्तीमत्व विकासात असलेली भूमिका या विषयांवर रासेयो स्वयंसेवकांनी आपली मनोगत व्यक्त केली. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक मा. श्रीकृष्णाजी घड्याळपाटील यांनी आपल्या मार्गदर्शनात ‘रासेयो समाजविकासात महत्वपूर्ण भमिका’ बजावू शकतो तसेच राष्ट्रउत्थानासाठी आवश्यक तरूणांना घडविण्याचे कार्ये राष्ट्रीय सेवा योजना करीत आहे, असे मत मांडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. जयश्री शास्त्री यांनी अध्यक्षीय समारोप राष्ट्रीय सेवा योजना शासन आणि समाज यांना जोडण्याचे कार्ये करते, असे विचार मांडले. या कार्यक्रमाचे संचालन रासेयो सहकार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक लोणकर यांनी केले. तर आभार प्रा. शेषराव तराळे यांनी मानले. या कार्यक्रमाची सांगता साने गुरूजींच्या ‘खरा तो एकची धर्म’ या गीताने झाली. या कार्यक्रमप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि रासेयो स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ब. १४ जुलै २०१८ – वृक्षारोपण**



वृक्षारोपण करतांना प्रा. तानाजी माने व प्रा. श्रीकंत पुरी



वृक्षारोपण करतांना डॉ. श्रीनिवास पिलगुलवार



वृक्षारोपण करतांना लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. श्रीकांत पाटील

महाराष्ट्र शासन, सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर विभाग यांच्या संदर्भ पत्र क्र उशिनाग/आस्था/वृक्षलागवड/९१६२/२०१८ दि. २६/०६/२०१८ च्यानुसार सत्र २०१८–१९ मध्ये १३ कोटी वृक्षलागवड मोहिमेअंतर्गत महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. श्रीकांतजी पाटील व लोकमान्य महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. जयश्री शास्त्री यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाअंतर्गत महाविद्यालयाच्या परिसरात ३० गुलमोहरची व ५ आंब्याची अशी एकुण ३५ वृक्ष लावण्यात आली.

## क) स्वच्छता कार्यक्रम अहवाल

| अ.क्र. | दिनांक | कार्यक्रम |
|---|---|---|
| १ | १४ ऑगस्ट २०१८ | श्रमदान |
| २ | ०२ ऑक्टोंबर २०१८ | महात्मा गांधी जयंती व स्वच्छता विषयक मोहिम |
| ३ | १३ व १४ डिसेंबर २०१८ | स्वच्छता सर्वेक्षण – न.प.वरोरा |
| ४ | १९ डिसेंबर २०१८ | स्वच्छता ॲप कार्यक्रम |
| ५ | २५ जानेवारी २०१९ | श्रमदान |

### १. १४ ऑगस्ट २०१८ – श्रमदान





श्रमदान करतांनी विद्यार्थी

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयाच्या परिसरात श्रमदानाचे आयोजन करण्यात आले. या श्रमदानात महाविद्यालयाच्या परिसरात चुरी टाकण्यात आली. गाजर गवत आणि अनावश्यक झाडे, झुडपांचे निर्मूलन करण्यात आले. स्वातंत्र्य दिनानिमित्त मैदानाची आखण करण्यात आली. मैदानावर आणि रस्त्याच्या बाजूला आलेल्या अनावश्यक गवत काढण्यात आले. या श्रमदानाच्या माध्यमातून स्वातंत्र्य दिनानिमित्त महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करण्यात आला

## २. ०२ ऑक्टोंबर २०१८ महात्मा गांधी जयंती

- **महात्मा गांधीजींना अभिवादन**



प्रास्ताविक करतांना प्रा. तानाजी माने



मार्गदर्शन करतांना डॉ. श्रीनिवास पिलगुलवार

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली च्या संदर्भ पत्र क्र. गोवि/डीएसडब्ल्यु/४९२/२०१८ **दि. २१/०९/२०१८ नुसार** वरोरा येथील स्थानिक लोकमान्य महाविद्यालयात २ ऑक्टोंबर २०१८ रोज मंगळवारला महात्मा गांधी जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा गांधीजींना अभिवादन करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. श्रीनिवास पिलगुलवार उपस्थित होते. या कार्यक्रमाचे मार्गदर्शक डॉ. श्रीनिवास पिलगुलवार यांनी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील महात्मा गांधीजीचे योगदान आणि महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील भारत या विषयावर स्वयंसेवकांना माहिती दिली. महात्मा गांधीना स्वतंत्र भारतात सुराज्य, स्वराज्य स्थापन करायचे होते. यावर आपले मत मांडले. तसेच या कार्यक्रमात स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनाही अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. तानाजी माने यांनी केले तर आभार रासेयो सहकार्यक्रम अधिकारी डॉ. दिपक लोणकर यांनी केले.

- **स्वच्छता रॅली**







**स्वच्छता रॅलीत सहभागी विद्यार्थी**

या कार्यक्रमानंतर वरोरा शहरात महात्मा गांधी चा स्वच्छता संदेश देण्यासाठी ‘स्वच्छता संदेश रॅली’ चे आयोजन करण्यात आले. या रॅलीची सुरूवात महाविद्यालयातून झाली. त्यानंतर वरोरा शहरातील राजीव गांधी चौक, स्वातंत्र्यवीर चौक, महात्मा गांधी चौक, पं. नेहरू चौक, ते नगरपरिषद वरोरा असा मार्गाने ही रॅली काढण्यात आली. या रॅलीच्या माध्यमातून अखंड भारत, महात्मा गांधीजीचे विचार, स्वच्छतेचे महत्व, पर्यावरण रक्षण, वृक्षसंवर्धन आदी बाबत गीतगायन व घोषणा देण्यात आल्या.

- **स्वच्छता मोहिम व स्वच्छतेची शपथ**




**स्वच्छता मोहिम व स्वच्छतेची शपथ घेतांनी उपस्थित विद्यार्थी**

या 'स्वच्छता रॅली' च्या समापनानंतर राष्ट्रीय सेवा योजना व नगरपरिषद वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने शहीद डाहुले चौक ते बसस्थानक वरोरा या ठिकाणी 'स्वच्छता मोहिम' राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत रस्त्याच्या बाजुचे प्लॉस्टिक, कचरा व गाजरगवत निर्मूलनाचे काम करण्यात आले. तसेच रस्त्यावरील कचरा साफ करण्यात आला. या स्वच्छता मोहिमेनंतर नगरपरिषद वरोरा येथील कार्यालयात रासेयो स्वयंसेवक व उपस्थित नागरिकांना 'स्वच्छतेची शपथ' देण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत लोकमान्य महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, वरोरा नगरपरिषदचे नगराध्यक्ष श्री अहेतेशाम अली, मुख्याधिकारी श्री. सुनिल बल्लाळ, नगरसेवक श्री. साखरीया, सौ. मरसकोल्हे, भाजपा वरोरा तालुका प्रमुख डॉ. भगवान गायकवाड, श्री कोटेचा आदिची प्रमुख उपस्थिती होती. या वरील सर्व कार्यक्रमाला रासेयोचे स्वयंसेवक व वरोरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## १३ व १४ डिसेंबर २०१८ स्वच्छता सर्वेक्षण- स्पर्धेत रासेयोचा सहभाग






**स्वच्छता सर्वेक्षण करतांना विद्यार्थी**

भारत सरकारच्या गृहनिर्माण व कार्य मंत्रालय द्वारा स्वच्छ सर्वेक्षण २०१८ ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. भारतातील विविध शहरात स्वच्छतेप्रती जाणीव जागृती निर्माण व्हावी. शहरातील साधी रोगांना आला बसावा या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित केली होती. या स्वच्छ स्पर्धेत वरोरा नगर परिषदेने सहभाग घेतला. त्याचाच एक भाग म्हणून वरोरा पातळीवर विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यात स्वच्छता जनजागर रॅली, स्वच्छता रॅली, स्वच्छता विषयी नागरिकांचे मते आदी वरोरा नगरपरिषदेद्वारा शहरातील नागरिकांच्या वरोराच्या सद्यस्थितीतील मते किंवा प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी शहर स्तरावर सर्वेक्षण घेण्यात आले. या सर्वेक्षणात महाविद्यालयातील रासेयो च्या १२ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. त्यात मुलाखती घेतांना विशेषतः मोबाइलचा वापर करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या या कार्याबद्दल नगरपरिषद वरोऱ्याचे नगराध्यक्ष अहतेशाम अली, मुख्याध्याधिकारी श्री. सुनिल बल्लाळ व महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. जयश्री शास्त्री यांनी अभिनंदन केले. या सर्वेक्षण कार्यासाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. तानाजी माने व रासेयो सहकार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक लोणकर यांचे मार्गदर्शन लाभले.

### ३. १९ डिसेंबर २०१८ ‘स्वच्छता ॲप’ विषयक कार्यक्रम साजरा




‘स्वच्छता ॲप’ विषयक कार्यक्रमात **मार्गदर्शन करतांना श्री सारगे (न.प.वरोरा)**

लोकमान्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व नगर परिषद वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९/१२/२०१८ ला ‘स्वच्छता ॲप’ विषयक कार्यक्रम घेण्यात आला. मोबाईलवर ‘स्वच्छता ॲप’ डाऊनलोड करून सामान्य नागरिकांनी स्वच्छता विषयी तक्रारी दाखल करण्याचा अभिनव उपक्रम वरोरा नगरपरिषद राबवित आहे. या स्वच्छता ॲपविषयी महाविद्यालयीन तरूणांमध्ये माहिती या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ता श्री. सारगे (न.प.वरोरा) यांनी हा ॲप डाऊनलोड करण्याविषयी माहिती दिली.

या कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. तानाजी माने यांनी केले तर आभार रासेयो सहकार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक लोणकर यांनी केले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व नगरपरिषदेतील कर्मचारी उपस्थित होते.

४. २५ जानेवारी २०१९ – **श्रमदान**





श्रमदान करतांना विद्यार्थी

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयाच्या परिसरात श्रमदानाचे आयोजन करण्यात आले. या श्रमदानात महाविद्यालयाच्या परिसरातील प्लॅस्टिक निर्मूलन करण्यात आले. गाजर गवत आणि अनावश्यक झाडे, झुडपांचे निर्मूलन करण्यात आले. प्रजासत्ताक दिनानिमित्त मैदानाची आखण करण्यात आली. मैदानावर आणि रस्त्याच्या बाजूला आलेल्या अनावश्यक गवत काढण्यात आले. या श्रमदानाच्या माध्यमातून प्रजासत्ताक दिनानिमित्त महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करण्यात आला.

## ड) रक्दान शिबिर - १० डिसेंबर २०१८




महाविद्यालयास सन्मानचिन्ह देतांना श्री. बाबरे




मार्गदर्शन करतांना श्री. बाबरे







रक्तदान करतांना विद्यार्थी

## ड) रक्दान शिबिर अहवाल- १० डिसेंबर २०१८

वरोरा येथील  लोकमान्य महाविद्यालय, वरोरा येथे राष्ट्रीय सेवा योजना, एच.डी.एफ. सी. बँक शाखा वरोरा व लाईफ लाईन ब्लड बँक, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १० डिसेंबर २०१८ रोज सोमवारला रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या रक्तदान शिबिराला सुरूवात करण्याआधी उद्घाटन कार्यक्रम घेण्यात आला. या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्या डॉ. जयश्री शास्त्री मॅडम होत्या. तर उद्घाटक म्हणून लाईफ लाईन ब्लड बँक, नागपूरचे श्री अविनाश बाबरे हे होते. या कार्यक्रमाचे उद्घाटक श्री अविनाश बाबरे यांनी रक्तदान शिबिराच्या आयोजनामागची भूमिका मांडली. तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्या डॉ. जयश्री शास्त्री मॅडम यांनी रक्दानाचे महत्व या विषयी विचार मांडले.

या उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. तानाजी माने यांनी केले तर आभार रासेयो सहकार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक लोणकर यांनी मानले. या रक्तदान शिबीरात महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांचा सक्रीय सहभाग होता. या रक्तदान शिबीरात १४ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

## इ. **विशेष शिबिर अहवाल–**

| अ. क्र. | कार्यक्रम |
|---|---|
| १ | उद्‌घाटन कार्यक्रम |
| २ | श्रमदान |
| ३ | बौद्धिक सत्र |
| ४ | सांस्कृतिक कार्यक्रम |
| ५ | मा. नामदार हंसराज अहिर यांची भेट |
| ६ | समारोप कार्यक्रम |

## १.    उद्‌घाटन कार्यक्रम



उद्‌घाटनप्रसंगी प्रास्ताविक करतांना प्रा. तानाजी माने



उद्‌घाटनप्रसंगी मार्गदर्शन करतांना सौ. सुवर्णरेखाताई पाटील



उद्‌घाटनप्रसंगी मार्गदर्शन करतांना प्रा. श्रीकांत पाटील


उद्‌घाटनप्रसंगी मार्गदर्शन करतांना श्री. श्रीकृष्णाजी घड्याळपाटील

## उद्‌घाटन कार्यक्रम अहवाल

वरोरा येथील लोकमान्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे सात दिवसीय विशेष शिबिराचे आयोजन मौजा वनोजा येथे करण्यात आले. या विशेष शिबिराचा कालावधी दि. ०१ जानेवारी ते ०७ जानेवारी २०१९ हा होता. हे विशेष शिबिर 'ग्रमोन्नतीकरिता युवा शक्ती शिबिर' या संकल्पनेवर आधारित होते. या विशेष शिबिरात ग्रामोन्नतीकरिता व युवकांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सात दिवसीय विशेष शिबिरात ७५ स्वयंसेवकांचा सहभाग होता. राष्ट्रीय सेवा योजनाच्या विशेष शिबिराचा उद्‌घाटन कार्यक्रम दि. ०१ जानेवारी २०१९ रोज सोमवारला दुपारी ३.०० वाजता घेण्यात आला. या उद्‌घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.पी. शास्त्री होत्या. तर उद्‌घाटक म्हणून मा. श्री. श्रीकृष्णाजी घड्याळपाटील (कार्यवाह, लोक शिक्षण संस्था, वरोडा) व मा. प्रा. श्रीकांतजी पाटील (अध्यक्ष, लोक शिक्षण संस्था, वरोडा), सामाजिक कार्यकर्त्या सौ. सुवर्णरेखाताई पाटील यांची उपस्थिती होती. तसेच या उद्‌घाटन कार्यक्रमाला वनोजाच्या सरपंच सौ. निर्मलताई गेघाटे, उपसरपंच श्री कमलाकर मत्ते, ग्रामपंचायत सदस्य श्री. रोहन मोडक यांची उपस्थिती होती. त्याचबरोबर या कार्यक्रमाला लोकमान्य महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद आणि वनोजा येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

२. श्रमदान



रासेयो कार्यक्रमात श्रमदान करतांना स्वयंसेवक



रासेयो कार्यक्रमात श्रमदान करतांना स्वयंसेवक






रासेयो कार्यक्रमात श्रमदान करतांना स्वयंसेवक

**२.श्रमदान अहवाल**

या सातदिवसीय विशेष शिबिरात ७५ स्वयंसेवक व गावकऱ्यांच्या सहभागातून गावांतील मुख्य रस्त्यावरील सांडपाण्याची व्यवस्था लावण्यासाठी रस्त्याच्या बाजूला नाली खोदकाम करण्यात आले. या सातदिवसीय विशेष शिबिरात श्रमदानाच्या माध्यमातून १०५ मीटर लांबी व दीड फूट रूंदीची नाली खोदण्यात आली. तसेच गावातील १५ घरांमध्ये शोषखड्डे श्रमदानाच्या माध्यमातून खोदण्यात आले. वनोजा गावातील रस्त्यावरील माती उचलण्याचे काम करण्यात आले. तसेच वरोरा वनोजा गावाचे दैवत असलेले अष्टविनायक गणेश मंदिराच्या परिसरात एकदिवसीय स्वच्छता विषयक मोहिम राबविण्यात आली. या सात दिवसीय विशेष शिबिराच्या माध्यमातून वनोजा ग्रामवासियांना स्वच्छता विषयक संदेश देण्यात आला.

३. बौद्धिक कार्यक्रम–




बौद्धिक कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना श्री अविनाश बन




बौद्धिक कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना सौ. सुवर्णरिखाताई पाटील




बौद्धिक कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना श्री नानाजी नागरकर




बौद्धिक कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना अप्पास संस्थेचे पदाधिकारी



बौद्धिक कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना श्री अरूण साळवे



बौद्धिक कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना डॉ. पिलगुलवार

## ४. बौद्धिक कार्यक्रम–

या सातदिवसीय विशेष शिबिरात स्वयंसेवकांचा बौद्धिक, मानसिक विकास व्हावा या दृष्टीने रोज दुपारी २.०० ते ४.३० या वेळेत बौद्धिक सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या बौद्धिक सत्रात विविध विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. त्यात श्री. अविनाश बन यांचे ‘प्रसार माध्यमांची बदलती भूमिका’, सौ. सुवर्णरेखाताई पाटील यांचे ‘आरोग्यम् धन संपदा’, श्री. नानाजी नागरकर यांचे ‘आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण’, अप्पास संस्था, वरोरा मार्फत ‘वन्यजीव प्राणी व घ्यावयाची दक्षता’, श्री. अरूण साळवे यांचे ‘योगाचे सैनिकी प्रशिक्षणात महत्व’, व श्री. मारोती वरभे यांचे ‘कृषिविषयक मार्गदर्शन’ अशा विविध विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

५. **सांस्कृतिक कार्यक्रम–**



सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्य सादर करतांना स्वयंसेवक




सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्य सादर करतांना स्वयंसेवक



सांस्कृतिक कार्यक्रमात नाटक सादर करतांना स्वयंसेवक



संगीतसंवादिनी कार्यक्रमात सादरीकरण करतांना श्री मल्हार




सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्य सादर करतांना वनोजाचे विद्यार्थी




सांस्कृतिक कार्यक्रमात नाटक सादर करतांना स्वयंसेवक

## ६. सांस्कृतिक कार्यक्रम-

समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ठ चालिरिती, रूढी, प्रथा व परंपरा याविषयी जनजागृती व्हावी या उद्देशाने सातदिवसीय विशेष शिबिरात दैनंदिन सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सांस्कृतिक कार्यक्रमात लघुनाटिका, लोकगीते व एकांकीका सादर करण्यात आल्या. त्यात 'मोबाईलचे दुष्परिणाम' हागणदारी मुक्त नाव', 'शोषखड्डे अभियान', शेतकरी आत्महत्या, व्यसनाधिनता, हुंडाबळी, स्त्रीशिक्षण आणि स्त्रीभ्रूनहत्या आदी विषयावर लघुनाटिका सादर करण्यात आल्या. तसेच दि. ०३/१/२०१९ रोज गुरूवारला श्री. मंगेशजी मल्हार यांच्या संगीत संवादिनी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दि. ५ जानेवारी २०१९ ला शिवछत्रपती समाज प्रबोधन मंडळाच्या समाजप्रबोधनात्मक नकलांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

### ७. मा. नामदार हंसराज अहिर यांची भेट–




सूत्रसंचालन करतांना प्रा. तानाजी माने




उपस्थित गावकऱ्यांशी चर्चा करतांना ना. अहिर

या सात दिवसीय विशेष शिबिराला केंद्रीय गृहराज्यमंत्री, भारत सरकार मा. नामदार हंसराजजी अहिर यांनी दि. ०५/१/०१९ रोज शनिवारला भेट दिली. मा. हंसराज अहिर यांनी या सात दिवसीय विशेष शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी केलेल्या कामाची पाहणी करून ते काम पूर्णत्वास नेण्याचे आश्वासन दिले. मान. अहिर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात राष्ट्रीय सेवा योजना ही नवतरूणांना घडविण्याचे उत्तम कार्य करते, असे मत मांडले. या कार्यक्रम प्रसंगी लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्रीकांत पाटील, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जयश्री शास्त्री आणि वनोजा गावातील ग्रामवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

८.  समारोप कार्यक्रम–




समारोपप्रसंगी मार्गदर्शन करतांना संजय देवतळे




समारोपप्रसंगी मनोगत करतांना स्वयंसेवक




समारोपप्रसंगी मार्गदर्शन करतांना प्राचार्य अनिलजी डोगरे




समारोपप्रसंगी मार्गदर्शन करतांना प्रा. श्रीकांतजी पाटील

### ९. समारोप कार्यक्रम–

राष्ट्रीय सेवा योजनाच्या विशेष शिबिराचा समारोपीय कार्यक्रमाचे आयोजन दि. ०७/१/२०१९ रोज सोमवारला सकाळी ११.०० वाजता करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयश्री शास्त्री ह्या होत्या. तर प्रमुख उपस्थिती म्हणून मा. संजयबाबू देवतळे (माजी सांस्कृतिक व पर्यावरण मंत्री, म.रा.), मा. प्रा. श्रीकांतजी पाटील (अध्यक्ष, लोक शिक्षण संस्था, वरोडा), मा. प्राचार्य अनिलजी डोंगरे(उपाध्यक्ष, लोक शिक्षण संस्था, वरोडा), सौ. निर्मलाताई गेघाटे (सरपंच वनोजा) या विशेष शिबिराच्या समारोप कार्यक्रमास लोकमान्य महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी वृंद आणि वनोजा येथील गावकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या विशेष शिबिराच्या माध्यमातून ५७,०००/– (सत्तावन हजार रू.) इतके मुल्याचे काम करण्यात आले.

# <u>वर्तमानपत्रातील बातम्यांची कात्रणे</u>



## लोकमान्य महाविद्यालयात लोकसंख्या दिन

प्रतिनिधी /२९ जुलै

खांबाडा : लोक शिक्षण संस्था वरोरा द्वारा संचालित लोकमान्य महाविद्यालय, वरोरा येथे लोकसंख्या शिक्षण मंडळ, महिला अध्ययन व सेवा केंद्र तसेच राष्ट्रीय सेवा योजना आणि विद्यार्थी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या सभागृहात 'जागतिक लोकसंख्या दिन' आणि प्राचार्यांचे अभिभाषण कार्यक्रम एकत्र आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून लोक शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अनिल डोंगरे यांनी ''जगाची समस्या ती आपली वैयक्तीक समस्या समजून कोणत्याही समस्येवर उपाय वापरल्यास ती समस्या दूर होते'' अशा दृष्टीकोनातून पर्याप्त लोकसंख्येबाबत विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यय म्हणून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.जयश्री शास्त्री या उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात नविन प्रवेशीत विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील सर्व विभागाची संपूर्ण माहिती दिली तसेच पदवी करीत अससतांना काय करणे पेक्षित आहे, या बाबत माहिती व मार्गदर्शन केले आणि लोकसंख्येबाबतही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रविंद्र शेंडे यांनी केले. तर प्रास्ताविक व परिचय प्रा.तानाजी माने यांनी केले आणि आभारप्रदर्शन प्रा.श्रीकांत पुरी यांनी केले.

## चांदो पब्लिक स्कूल येथे स्व. संजय

प्रतीनीधी /२९ जुलै

चंद्रपूर : चंद्रपूरातील विद्यार्थ्यांना काळानुरूप आंतरराष्ट्रीय उच्च शिक्षण उपलब्ध व्हावे असा उदात्त हेतू मनाशी बाळगून स्व. संजय श्रीहरी जिवतोडे यांनी चांदा पब्लिक स्कूलचा पाया घालून विद्यार्थ्यांना उच्च उर्जाच्या शैक्षणिक सुविधांची संधी उपलब्ध [illegible]

दैनिक दैशोन्नती



## लोकमान्य महाविद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम

प्रतिनिधी / २ ऑगस्ट

खांबाडा : वरोरा येथील लोकमान्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत ''२०१७ ते २०१९ या तीन वर्षाच्या कालावधीमध्ये एकूण ५० कोटी वृक्ष लागवड'' या महाराष्ट्र शासनाच्या संकल्पानुसार महाविद्यालयाच्या परिसरात वृक्ष लागवड कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

[illegible] स्तरावर मान्य झाले आहे. सार्वजनिक समस्या हि वैयक्तिक समस्या समजून महाविद्यालय पातळीवर दरवर्षी वृक्ष लागवडीचे व संगोपनाचे कार्य चालतात. वृक्ष लागवड कार्यक्रमामध्ये एकूण ५० वृक्षांची महाविद्यालयाच्या परिसरात लागवड करण्यात आली आहे व संगोपन करण्यात येत आहे. या कार्यक्रमात लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.श्रीकांत पाटील, प्राचार्य (प्रभारी) डॉ.जयश्री शास्त्री, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## आय, इन्कम टॅक्स जिल्हा काँग्रेस कमेटी

[illegible]

दैनिक दैशोन्नती



देशोन्नती

## लोकमान्य महाविद्यालयात रासेयो दिन

तालुका प्रतिनिधी / २९ सप्टेंबर

वरोरा : वरोरा येथील लोकमान्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे 'राष्ट्रीय सेवा योजना दिना' निमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्या डॉ.जयश्री शास्त्री तर प्रमुख वक्ता म्हणून समाजसेविका सुवर्णरेखा पाटील यांची उपस्थिती होती. प्रमुख वक्ता सुवर्णरेखा पाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्दिष्ट व कार्यासंबंधी सविस्तर माहिती दिली. 'सेवा'ची सुरुवात स्वसेवापासून झाली पाहिजे. त्यानंतर कुटूंब सेवा, समाजसेवा व राष्ट्रसेवा पर्यंत त्याचा आलेख उंचावत गेला पाहिजे. सेवा करताना कोणत्याही फळाची आणि कोणत्याही प्रकारची लाज बाळगता कामा नये. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून देशात, समाजात भरीव असे रचनात्मक कार्य करता येऊ शकते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा जयश्री शास्त्री यांनी राष्ट्रीय सेवा योजनेत सर्वात महत्वाचा घटक हा स्वयंसेवक आहे. या रासेयो स्वयंसेवकांच्या माध्यमातून समाजातील विविध समस्यांबाबत जनजागृती घडवून आणली येते. तसेच विविध शासकीय व स्वयंसेवी संस्थांना सहकार्य करण्यासाठी रासेयो महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे, असे मत मांडले. संचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे सहकार्यक्रम अधिकारी डॉ.दिपक लोणकर यांनी केले. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.तानाजी माने यांनी केले आभारप्रदर्शन प्रा.विशाखा मेंढारे यांनी केले. कार्यक्रमाला प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## द्र अगळेंचा सेवानिवृत्ती सत्कार

[illegible]

दैनिक दैशोन्नती



## न. प. तर्फे 'स्वच्छता अभियान संपन्न'

वरोरा (ता.प्र.)- नगरपरिषद वरोरा व राष्ट्रीय सेवा योजना लोकमान्य महाविद्यालय वरोरा यांचे संयुक्त विद्यमाने स्वच्छता हिच सेवा या मोहीमे अंतर्गत म. गांधी जयंती निमित्त शहीद डाहुले चौक ते एस. टी स्टॅण्ड रोड पावेतो स्वच्छता अभियान राबविण्यात आले. अभियानाची सुरूवात नगर परिषदेपासुन प्रभात फेरी काढुन करण्यात आली. प्रभातफेरीत राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी व न. प. कर्मचारी यांचे समवेत अहेतेशाम अली अध्यक्ष सुनील बल्लाळ मुख्याधिकारी अनिल झोटींग उपाध्यक्ष, अॅड प्रदिप बुराण, डॉ. गुणवंत दुर्गे, सदस्य अनिल साकरिया, डॉ. गायकवाड, छोटूभाई शेख, बाबा भागडे, ममता मरसकोल्हे, दिलीप घोरपडे, मनिषा मेश्राम, सुनिता काकडे, अक्षय भिवदरे, रेखा समर्थ, मंगला पिंपळकर, दिपाली टिपले, सरला तेला, देऊळकर सर, माने सर व पेडगुलवार उपस्थित होते. अहेतशाम अली, व सुनिल बल्लाळ मुख्याधिकारी यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व समजावून सांगितले त्यानंतर नगरपरिषदेचे कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियानादम्यान शहीद डाहुले चौक परिसराची स्वच्छता केली. त्यानंतर स्वच्छता अभियानाची सांगता नगर परिषद सभागृहात सर्व मान्यवर, न. प. कर्मचारी, महाविद्यालयीन विद्यार्थी यांचे समक्ष कार्यक्रम अधिक्षक डॉ. प्रकाश कोटेचा यांनी स्वच्छतेची शपथ वाचन करून सर्वांना स्वच्छतेची शपथ दिली. कार्यक्रम करीता स्वच्छता अभियंता आशिष गेडाम, भूषण सालवटकर, उमेश ब्राम्हणे, सर्व विभाग प्रमुख न. प. कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. (स)

चंद्रपूर समाचार




स्वच्छता अभियानात सहभागी झालेले अहेतेश्याम अली व विद्यार्थी

## महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान

वरोडा, १० ऑक्टोबर

नगर परिषद व राष्ट्रीय सेवा योजना लोकमान्य महाविद्यालय वरोडा यांच्या संयुक्त वतीने स्वच्छता ही सेवा या मोहिमेंतर्गत महात्मा गांधी जयंतीनिमित्त शहीद डाहुले चौक ते बस्टी स्टॅण्डपर्यंत स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

अभियानाची सुरुवात नगर परिषदेपासून प्रभातफेरी काढून करण्यात आली. प्रभातफेरीत राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी व नप कर्मचारी यांच्यासमवेत नगराध्यक्ष अहेतेश्याम अली, मुख्याधिकारी सुनील बल्लाळ, उपाध्यक्ष अनिल झोटिंग, ॲड. प्रदीप बुराण, डॉ. गुणानंद दुर्गे, अनिल साकरिया, डॉ. गायकवाड, छोटूभाई शेख, बाबा भागडे, ममता मरस्कोल्हे, दिलीप घोरपडे आदी उपस्थित होते.

अहेतेश्याम अली व सुनील बल्लाळ यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगितले. त्यानंतर नगर परिषदेचे कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियानादरम्यान शहीद डाहुले चौक परिसराची स्वच्छता केली. त्यानंतर स्वच्छता अभियानाची सांगता नगर परिषद सभागृहात सर्व मान्यवर, नप कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासमक्ष कार्यालय अधीक्षक डॉ. प्रकाश कोटेचा यांनी स्वच्छतेची शपथ दिली. यशस्वितेसाठी स्वच्छता अभियंता अभिषेक गेडाम, स्वच्छता निरीक्षक भूषण सातवटकर, उमेश ब्राह्मणे, सर्व विभागप्रमुख, नप कर्मचारी यांनी सहकार्य केले. (तभा वृत्तसेवा)

चंद्रपूर समाचार

मंगळवार, दि. ११ डिसेंबर २०१८   ६

epaper.-deshonnati.com

### थोडक्यात

## लोकमान्य महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन

खांबाडा : स्थानिक लोक शिक्षण संस्थेद्वारा संचालित लोकमान्य महाविद्यालयाच्या मराठी विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभागाच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६२ वा महापरिनिर्वाण दिनाचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकमान्य महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. जयश्री शास्त्री तर प्रमुख वक्ते प्रा. बबन अवघडे मराठी विभाग, आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा होते. त्यांनी बाबासाहेबांचे जीवन कार्य तसेच "आंबेडकरवादी साहित्य" या विषयावर प्रकाश टाकला. सुत्रसंचालन प्रा. रजनीगंधा खिरटकर यांनी केले तर आभारप्रदर्शन ग्रंथपाल लीना पुप्पलवार यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला.

## कर्मवीर विद्यालय गवराळा येथे गोवर रुबेला लसीकरण मोहीम

दैनिक देशोन्नती

दै. देशोन्नती दि. 12/12/2018

## लोकमान्य महाविद्यालय वरोरा येथे रक्तदान शिवीर



प्रतिनिधी /११ डिसेंबर

खांबाडा : वरोरा येथील लोकमान्य महाविद्यालय, वरोरा येथे राष्ट्रीय सेवा योजना, एच.डी.एफ.सी. बँक शाखा वरोरा व लाईफ लाईन ब्लड बँक, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१० डिसेंबर २०१८ रोज सोमवारला रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या रक्तदान शिबिराला सुरुवात करण्याआधी उदघाटन कार्यक्रम घेण्यात आला. या उदघाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य जयश्री शास्त्री होत्या. तर उदघाटक म्हणून लाईफ लाईन ब्लड बँक, नागपूरचे अभिनाश बाबरे हे होते. या कार्यक्रमाचे उदघाटक अभिनाश बाबरे यांनी रक्तदान शिबिराच्या आयोजनाबाबतची भूमिका मांडली तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्या जयश्री शास्त्री यांनी रक्तदानाचे महत्व या विषयी विचार मांडले. या उदघाटन कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी तानाजी माने यांनी केले तर आभार रासेयो सहकार्यक्रम अधिकारी दिपक लोणकर यांनी मानले.

या रक्तदान शिबिरात महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांचा सक्रिय सहभाग होता. या रक्तदान शिबिरात १४ रक्तदात्यांनी रक्तदान केले.


प्रेरणास्थान



किसान विद्यालय सेवकांची सहकारी पतसंस्था, मर्या., माढेळी, र.नं. २१० तर्फे डोंगरगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, माजी आमदार तथा जेष्ठ स्वातंत्र्य संग्राम सेनानी स्व. नारायनराव हरबाजी माथनकर यांना १०६ वी जयंती निमीत्य विनम्र अभिवादन !

स्व. ना. ह. माथनकर


दैनिक देशोन्नती

## राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर



[illegible]

दैनिक देशोन्नती

लोक शिक्षण संस्था, वरोडा द्वारे संचालित

# लोकमान्य महाविद्यालय वरोरा जि. चंद्रपूर

# राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल

(सत्र २०१९.२०२०)


प्रा. डॉ. दीपक पां. लोणकर प्रा. रविंद्र बा. शेंडे डॉ. एस. के. सिंग

कार्यक्रम अधिकारी, सहकार्यक्रम अधिकारी प्राचार्य

लोकमान्य महा. वरोरा

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शिर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ०३ |
| २ | नियमित कार्यक्रम अहवाल | ०४ |
| ३ | वृक्षारोपण कार्यक्रम अहवाल | ०८ |
| ४ | स्वच्छता कार्यक्रम अहवाल | ०९ |
| ५ | व्यसनमुक्ती कार्यक्रम अहवाल | ११ |
| ६ | विशेष शिबिर कार्यक्रम अहवाल | १२ |
| ७ | विद्यापीठ व राज्यस्तरीय शिबीर कार्यक्रम अहवाल | १३ |
| ८ | छायाचित्रे व बातमी | १४ |

**प्रस्तावना —**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांच्या सर्वागीण व्यक्तिमत्व विकास घडवून आणून त्यांच्यातील नेतृत्वगुणाचा विकास करणे यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना २ आक्टो १९६९ रोजी म्हणजे महात्मागांधीच्या जन्मशताब्दी वर्षापासुन महाविद्यालयीन विद्यार्थ्यासाठी करण्यात आली. ही योजना भारत सरकारच्या युवा कल्याण व क्रिडा मंत्रालयाच्या अंतर्गत राबविण्यात येत असून आज देशभरात अनेक महाविद्यालयात ही योजना कार्यरत आहे.

लोकमान्य महाविद्यालयाच्या स्थापनेपासुनच म्हणजे १९९८ पासुन महाविद्यालयात ही योजना स्विकारण्यात येऊन आजपर्यत तीची वाटचाल निरंतर सुरू आहे व राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून लोकमान्य महाविद्यालयाची एक वेगळी ओळख वरोरा परीसरात निर्माण झाली आहेण वरोऱ्यातील कुठलीही सामाजिक समस्या किंवा सामाजीक बांधलकीची धोरणे असो त्यामध्ये महाविद्यालयाचा सहभाग असतोच. वरोरा नगरपरीषद, रोटरी क्लब, इनरव्हील क्लब, गांधी उद्यान मंडळ, गुरूदेव सेवा मंडळ व इतर वरोऱ्यातील सामाजीक संस्था या नेहमी लोकमान्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहकार्याने जाणीव जागृती व सामाजीक समस्या सोडविण्याचे काम करतात. त्यामध्ये स्वच्छता, वृक्षारोपण, ग्रामसफाई, गणपती विसर्जन बदोबस्त, मतदार जागृती, एड्स सप्ताह इत्यादी सारख्या शासकीय व गैरशासकीय उपक्रमात महाविद्यालयाचे रा: से यो चे विद्यार्थी आपले योगदान देत असतात.

महाविद्यालयाने रा से यांच्या माध्यमातून वरोरा परीसरात व गावात वेगवेगळे प्रकल्प राबविले आहे त्यात व्यसनमुक्ती, दारूबंदी, स्वच्छता, गाजर गवत निर्मूलन, अंधश्रध्दा, हागंदारी मुक्त गाव, स्वच्छ व सुंदर गाव, गुटखा मुक्ती, हुंडाबळी इत्यादी च्या माध्यमातून गावागावत जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे. विशेष राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराच्या व दैनंदिन कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी सक्रीयपणे कार्य करतात. महाविद्यालयाचे पहिले विशेष शिबीर हे गडचिरोली जिल्हयातील आलिंगा या माडीया आदीवासी खेड्यात घेतले हे विशेष. याशिवाय दरवर्षी विशेष शिबिराचे आयोजन केल्या जात असते आजपर्यत २२ शिबिराचे आयोजन केल्या जात असते आजपर्यत २२ शिबिराचे यशस्वी आयोजन करून वरोरा तालुक्यात आपले नावलौकीक निर्माण केला आहे.

याशिवाय महाविद्यालयातही वर्षभर वेगवेगळे उपक्रम राबवून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, चारीत्र्यसंवर्धन व सामाजीक बांधीलकी या मूल्याचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करीत आहे व या वर्षभर चालणाऱ्या उपक्रमात विद्यार्थी आपला सक्रिय सहभाग देऊन समजासेवेचे वृत जोपासत आहे. सत्र २०१९—२० या वर्षात रा.से.या. च्या कार्याची जबाबदारी प्राचार्य डॉ. सुबोध कुमार सिंग यांच्या मार्गदशात कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. दीपक लोणकर व सहकार्यक्रम अधिकारी प्रा. रविंद्र शेंडे हे सांभाळत असून महाविद्यालयामध्ये १५० विद्यार्थ्यांचे रा. सो.य यो एकक कार्यरत आहे. तसेच दरवर्षी विद्यापीठ स्तरीय, राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या शिबिरात ही महाविद्यालयाचे विद्यार्थी सक्रिय सहभाग घत असतात.

(अ) नियमित कार्यक्रम अहवाल
(ब) वृक्षारोपण कार्यक्रम
(क) स्वच्छता अहवाल
(ड) व्यसनमुक्ती कार्यक्रम अहवाल
(इ) विशेष शिबिर

**(अ) नियमित कार्यक्रम अहवाल**

**(१) २१ जून २०१९ — आंतराष्ट्रीय योग दिन**

राष्ट्रीय सेवा योजना व शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यामाने २१ जुन रोजी जागतिक योग दिनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकशिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. श्रीकांतजी पाटील तर प्रमुख वक्ता म्हणून वरोऱ्यातील योगपटू श्री. गजानन पुरकर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन शारीरिक शिक्षण विभाग संचालक प्रा. उत्तम देऊळकर यांनी केले. या कार्याक्रमाला रा.सो.यो. स्वयंसेवका बरोबरच वरोऱ्यातील प्रतिष्टित नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**उपस्थिती संख्या —** या कार्यक्रमाला २०० व्यक्ति उपस्थित होते.

**फलनिष्पत्ती —** या कार्यक्रमाचे स्वरूप हे कार्यशाळेसारखे असून या कार्यक्रमातून निरोगी आरोग्यासाठी योग प्राणायमाचे धडे व प्राकर उपस्थितांनी जाणून घेतले व ते करण्याची शास्त्रीय पध्दत व उपयोगातून मिळणारे लाभ याची माहिती मिळाली.

**(२) ११ जुलै २०१९ जागतिक लोकसंख्या दिन**

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना लोकसंख्या शिक्षण मंडळ व महिला सेवा आणि अध्ययन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जयश्री शास्त्री या असुन प्रमुख वक्ता म्हणून डॉ. हेमंत खापणे यांची उपस्थिती होती. या प्रसंगी त्यांनी लोकसंख्या वाढची कारणे, परीणाम व त्यावरील उपाययोजना याविषयाी मार्गदर्शन केले.

**उपस्थित संख्या —** या कार्यक्रमासाठी २०० विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

**फलनिष्पत्ती —** या कार्यक्रमामुळे लोकसंख्येच्या वाढत्या समस्येबाबत विद्यार्थ्यामध्ये जाणीव निर्माण झाली.

**९ ऑगस्ट २०१९ — जंतनाशक गोळ्या वाटप**

उपजिल्हा रूग्णालय वरोराच्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने जंतनाशक गोळ्या वाटपाचा कार्यक्रम राविण्यात आला व आरोग्याबाबतची माहिति उपजिल्हा रूग्णालयातील कर्मचाऱ्यांनी दिली. या जंतनाशक गोळ्या वाटपाचा लाभ ३०० विद्यार्थ्यांनी घेतला.

**उपस्थित संख्या — —** या कार्यक्रमासाठी ३०० विद्यार्थ्यांची सहभागी होती.

**फलनिष्पत्ती —** जंतामुळे होणारे शरीरावरील परीणाम याची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.

**२३ ऑगष्ट २०१९ — पुरग्रस्तासाठी मदत रॅली**

महाराष्ट्रात नैसर्गीक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. विशेषता कोल्हापुर व सांगली जिल्ह्यात पावसामुळे प्रचंड नुकसान होऊन अनेकांचे संसार उघण्यावर आले यामुळे महाराष्ट्र सरकारने जनतेला मदतीचे आवाहन केले. तेव्हा या आवाहनाला प्रतिसाद देऊन गोंडवाना विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाला आवाहन करून मदत साहित्य जमा करण्यास सांगण्यात आले. त्यानुसार महाविद्याल याच्या वतीने २३ ऑगस्ट २०१९ रोजी कोल्हापूर—सांगली पुरग्रस्तासाठी साहित्य मदत रॅलीचे आयोजन मोठ्या प्रमाणावर करण्यात आले. संपूर्ण वरोरा परीसरात १५ ग्रुप पाठवून साहित्याची मदत उदा. तांदूळ, गहू, कापड, किराणा इत्यादी साहित्य अंदाजे ७५,०००/— रू. किमतीचे गोळा करण्यात आले. या प्रसंगी प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी परीश्रम घेतले. तसेच पुरग्रस्तासाठी रोख स्वरूपात निधी गोळा करण्यात आला. त्यात ३९०००/— रू. निधी गोळा होऊन

महाविद्यालयाच्या वतीने १२०००/— निधी उपलब्ध करून दिला गेला. या रॅलीचे सौ. देशमुख मॅडम (व्यवस्थापक महाराष्ट्र बॅक) यांना हिरवी झेंडी दाखविली.

पुरग्रस्तासाठी गोळा केलेला अंदाजे ७५०००/— रू. चा साहित्य हे २८.०८.२०१९ रोजी विद्यापीठाचे रा.से.यो समन्वयक श्री. डॉ. नरेश मडावी यांचेकडे सुपुर्द करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक लोणकर व सहकार्यक्रम अधिकारी प्रा. रविंद्र शेंडे उपस्थित होते.

तसेच पुरग्रस्तासाठी रोख स्वरूपात केलेला ५१,०००/— रू चा निधी हा महाराष्ट्र बॅकेच्या माध्यमातून मुख्यमंत्री पुरग्रस्तासाठी सहाय्यता निधी A/c No. 10972433751 या खात्यात Bank of India, Main Branch, Fort Mumbai या शाखेत दिनांक २९.०८.२०१९ रोजी जमा करण्यात आला.

**उपस्थित संख्या —** या कार्यक्रमासाठी ३५० विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

**फलनिष्पत्ती —** या कार्यक्रमातून विपत्ती मुळे होणाऱ्या संकटाला आपणही समाजकार्याच्या माध्यमातून मदत करू शकतो व देशसेवेत योगदान देऊ शकतो याची जाणीव झाली.

**२०.०९.२०१९ श्रमदान**

म्हाविद्यालयातील विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्व कळून श्रमसंस्कार होण्यासाठी २०.०९.२०१९ रोजी महाविद्यालयाच्या व महाविद्यालयाच्या बाहेरील परीसरात श्रमदानाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी प्लास्टीक कचरा, गाजर गवत निर्मुलन कार्यक्रम राबविण्यात आला.

**उपस्थित संख्या —** या कार्यक्रमात ३०० विद्यार्थी सहभागी झाले.

**फलनिष्पत्ती —** विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्व कळाले.

**२४.०९.२०१९ राष्ट्रीय सेवा योजना दिन**

राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे औचित्य साधुन राष्ट्रीय सेवा योजना दिन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य सुबोधकुमार सिंग तर प्रमुख वक्ता म्हणून प्रा. विनायकजी तराळे माजी रसायनशास्त्र विभाग प्रमुख आ. नि. महा. वरोरा हे उपस्थित होते या प्रसंगी त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून रा.से.यो विद्यार्थ्यांनी समाजकार्यात अग्रेसर राहून समाजाचे ऋण फेडावे असे सांगितले.

**उपस्थित संख्या —** या कार्यक्रमास १५० विद्यार्थी उपस्थित होते.

**फलनिष्पत्ती —** या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा यांच्या कार्याची माहिती मिळून आपणही Not I But You या प्रमाणे वागले पाहिजे ही शिकवण मिळाली.

**१२.१०.२०१९ मतदार जनजागृती रॅली**

लोकशाहीचे महत्व लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्व कळावे यासाठी मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन नगर परीषदेच्या सहकार्याने करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्व स्पष्ट करून नगरवासियांनाही त्याचा प्रचार करण्यासाठी रॅलीचे आयोजन महाविद्यालय माढेळी नाका, सावरकर चौक, गांधी चौक, नेहरू चौक, नगर परीषद या मार्गाने करण्यात आले. या प्रसंगी मतदार जागृतीचे फलक दाखवून जागृती संदर्भात घोषणा देण्यात आल्या.

**उपस्थित संख्या —** या कार्यक्रमास १७० विद्यार्थी उपस्थित होते.

**फलनिष्पत्ती —** या रॅलीमुळे विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्व कळाले.

**२५ नोव्हेंबर २०१९ सविधान दिन**

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास? विभागाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २५/११/२०१९ रोजी संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी अध्यक्ष म्हणून प्राचार्य सुबोधकुमार सिंग तर प्रमुख वक्ता म्हणून प्रा. तानाजी माने हे उपस्थित होते. या प्रसंगी प्रमुख वक्ता प्रा. तानाजी माने यांनी आपल्या मार्गदर्शनातून सविधान निर्मितीवर प्रकाश टाकला तर अध्यक्ष प्राचार्य सिंग यांनी सविधानाचे महत्व यावर आपले विचार मांडले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. शेंडे सर तर प्रास्ताविक प्रा. दीपक लोणकर यांनी केले.

**उपस्थित संख्या –** या कार्यक्रमास १४० विद्यार्थी उपस्थित होते.

**फलनिष्पत्ती –** विद्यार्थ्यांना राज्यघटनेची प्रक्रिया लक्षात येऊन स्वतःचे अधिकार व कर्तव्ये याची जाणीव झाली.

**१ डिसेंबर जागतीक एड्स दिन**

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व लोकसंख्या शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १ डिसेंबर २०१९ रोजी जागतिक एड्स दिनाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. या प्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुबोध कुमार सिंग तर प्रमुख वक्ता म्हणून डॉ. संजय आसुटकर (वैद्यकीय तालुका अधिकारी भद्रावती) हे उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. आसुटकर यांनी जगातील एड्सचा उगम, आकडेवाडी व लक्षणे व उपाययोजना याबद्दल मार्गदर्शन केले. तर डॉ. सिंग सर यांनी युध्द एड्स रोगाबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन प्रा. रविंद्र शेंडे सर, प्रास्ताविक प्रा. पुरी सर तर आभार प्रा. डॉ. लोणकर यांनी मानले.

**उपस्थित संख्या –** या कार्यक्रमास १३५ विद्यार्थी उपस्थित होते.

**फलनिष्पत्ती –** एड्स या भयंकर आजराबद्दलची माहिती विद्यार्थ्यांना मिळाले व त्याच्या उपयोजना व सुरक्षितेची उपाय लक्षात आले.

**०६ डिसेंबर डॉ. आंबेडकर महापरीनिर्माण दिन व रक्तदान शिबिर**

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ०६ डिसेंबर २०१९ रोजी डॉ. आंबेडकर महापरीनिर्माण दिनाचे औचित्य साधून एच.डी.एफ.सी. बॅक वरोरा a life line blood bank नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य सुबोधकुमार सिंग हे असून प्रमुख उद्‌घाटक व वक्ता लाईफ लाईन ब्लड बॅकेचे डॉ. सिंग मॅडम असून याप्रसंगी एच.डी.एफ.सी. बॅकेचे श्री. रोहित बोढे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात डॉ. बाबा साहेब आंबेडकराच्या प्रतिमेला मालाअर्पण करून करण्यात आली. या प्रसंगी डॉ. सिंग मॅडम यांनी रक्तदानाचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले तर प्राचार्य डॉ. सुबोधकुमार सिंग यांनी डॉ. आंबेडकरांचे जीवनचत्रीत व कार्य यांची विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संचालन रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक लोणकर यांनी केले तर आभार सहकार्यक्रम अधिकारी प्रा. रविंद्र शेंडे यांनी मानले. या रक्तदान कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्सफुर्त सहभाग दिला यावेळी ४१ रक्तदात्यांनी रक्त दान केले त्यात गावातले नागरीक, विद्यार्थी, शिक्षक व प्राध्यापक वृंद सहभागी होता.

**उपस्थित संख्या –** या कार्यक्रमाला १३० विद्यार्थी उपस्थित होते.

**फलनिष्पत्ती –** या कार्यक्रमातून रक्तदानाचे महत्व विद्यार्थ्यांना कळले व रक्तदान हेच श्रेष्टदान आहे याची जाणीव झाली.

**२०/१२/२०१९ गाडगेबाबा पुण्यतिथी व श्रमदान**

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक २०.१२.२०१९ रोजी गाडगेबाबा पुण्यातिथीचे आयोजन महाविद्यालयाच्या पटागणावर करण्यात आले. या प्रसंगी गाडगेबाबाच्या प्रतिमेला माल्यार्पन करून कार्यक्रमाची सुरूवात करणत आली. या प्रसंगी कार्यक्रम अधिकारी अधिकारी डॉ. दीपक लोणकर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुबोधकुमार सिंग यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

गाडगेबाबानी आपला जीवनात स्वच्छतेला फार महत्व दिले त्यामुळे त्यांची पुण्यतिथी स्वच्छता दिन म्हणून महाविद्यालयात साजरी करण्याचे ठरविले गेल्यामुळे विद्यार्थ्यांना श्रमसंस्काराचे धडे देण्यासाठी कार्यक्रमानंतर महाविद्यालयातील परीसरात श्रमदानाचे आयोजन करण्यात आले होते त्यात विद्यार्थ्यानी महाविद्यालयाचा परीसर झाडून स्वच्छ करून प्लॉस्टीक निर्मुलन व परीसर स्वच्छता केली. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

**उपस्थित संख्या –** या कार्यक्रमाला ३५० विद्यार्थी उपस्थित होते.

**फलनिष्पत्ती –** या कार्यक्रमातून गाडगे महाराजाचे जीवन चरीत्र विद्यार्थ्यांना कडून स्वच्छतेचे महत्व कळले.

**२५.०२.२०२० कोरोना आजार व प्रतिबंधक उपाय –**

जगात व देशात मोठ्या प्रमाणात कोरोना वायरस या आजाराचा झपाट्याने प्रसार होत असल्यामुळे त्याबाबत विद्यार्थ्यामध्ये जनजागृती करण्यासाठी दिनांक २५ फेब्रुवारी २०२० रोजी 'कोरोना आजार व प्रतिबंधक उपाय' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. या प्रसंगी अध्यक्ष म्हणून डॉ. पिलगुलवार तर प्रमुख वक्ता म्हणून डॉ. चवले हे उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. चवले यांनी कोरोना आजाराची लक्षणे व इतर माहिती देऊन त्यावर उपाययोजना सांगितल्या. या कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन रा.से.यो. सहकार्यक्रम अधिकारी प्रा. रविंद्र शेंडे यांनी केले.

**उपस्थित संख्या –** या कार्यक्रमाला १५० विद्यार्थी उपस्थित होते.

**फलनिष्पत्ती –** कोरोना या आजाराची लक्षणे व उपाय याची माहिती मिळून Social Disstansing ची आवश्यकता विद्यार्थ्यांना कळली.

**मास्क वितरण कार्यक्रम व कोरोना जनजागृती २९.०४.२०२०**

देशामध्ये कोरोना विषाणूचे वाढते स्वरूप पाहून त्यावर मात करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने ही राष्ट्रीय सेवा योजना एककाला त्यात सहभागी होण्याचे आवाहन केले व जनजागृती करण्यास सांगितले त्यामुळे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाच्या विद्यार्थ्यांनी गृहअर्थशास्त्र विभागाच्या सहकार्याने मास्क तयार करून वितरीत करण्यात उपक्रम हाती घेण्यात आला. यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या २५ विद्यार्थ्यानी जवळपास २५० मास्क तयार केले व दिनांक २९.०४.२०२० रोजी बुधवार ला एकोणा या गावात प्राचार्य डॉ. सुबोध कुमार सिंग, डॉ. दीपक लोणकर (कार्यक्रम अधिकारी), प्रा. रविंद्र शेंडे (सहकार्यक्रम अधिकारी) व प्रा. जावधव यांचा मार्गदर्शनात १५० मास्क चे वितरण करण्यात आले. तसेच यावेळी एकोणाच्या सरपंच पिजदुरकर मॅडम, उपसरपंच श्री. पहापळे तसेच ग्रा. प. सदस्य व ग्रामसेवक श्री. कावडकर, व अंगणवाडी सेविका सौ. मत्ते या उपस्थित होत्या.

तसेच कोरोना आजाराच्या जनजागृतीसाठी रा. से. यो. स्वयंसेवकांनी आरोग्य सेतू ॲप आपल्या मोबाईल मध्ये डाऊनलोड करण्यास सांगीतले गेले तसेच कोरोना आजारासंबंधीत वेगवेगळ्या महाविद्यालयाच्या प्रश्नमंजूषेतही विद्यार्थ्यानी आपला सहभाग नोंदवून जनजागृती प्रसार कार्यातही स्वयसेवकांनी आपला सहभाग नोंदविला. एकुणच कोराना आजाराच्या जनजागृतीच्या संदर्भात महाविद्यालयाने पुढाकार घेऊन जनजागृती करण्याचे कार्य केले.

**उपस्थित संख्या –** या कार्यक्रमात ३० विद्यार्थी उपस्थित होते.

**फलनिष्पत्ती –** कोरोनाला हरविण्यासाठी आपणच स्वत: काळजी घेतली पाहिजे यासाठी Mask वापरण्याची महत्व त्यांनी इतरांना समजावून सांगून घरातच राहण्याचा संदेश गावकऱ्यांना दिला.

**(ब) वृक्षारोपण –**

**दिनांक ०१/०७/२०१९ – राज्यस्तरीय वृक्षलागवड मोहिमे चे उद्घाटन**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने ३३ कोटी वृक्षलावगड कार्यक्रम यावर्षी हाती घेण्यात आला आहे. तेव्हा या वृक्षलागवड कार्यक्रमाच्या मोहीमेचा उद्घाटन समारंभ कार्यक्रम आनंदवन येथे महाराष्ट्र शासन व वन विभागाच्या वतीने मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस व अर्थमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमात महाविद्यालयातील रा.से.यो. च्या विद्यार्थ्यांनी व कार्यक्रम अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.

**उपस्थित संख्या –** या कार्यक्रमाला २५ विद्यार्थी उपस्थित होते.

**फलनिष्पत्ती –** वृक्षलागवडीची माहिती मिळून वृक्षलावडीचे महत्व कळले.

**दिनांक १५/०७/२०१९ वृक्षरोपण**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने ३३ कोटी वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाचे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेऊन महाविद्यालयाच्या परीसरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने १० सप्तपर्णी वृक्षाची लागवड करण्यात आली त्याच बरोबर चाफा, बोगन वेल व घरटी फुल झाडे वेलांची लागवड प्रभारी प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थ्याच्या मदतीने करण्यात आली.

**उपस्थित संख्या –** या कार्यक्रमाला ५० विद्यार्थी उपस्थित होते.

**फलनिष्पत्ती –** वृक्षलागवडीमूळे पर्यावरणाचे रक्षणाचे महत्व विद्यार्थ्यांना कळले व त्यांच्यात जागृती निर्माण झाली.

**(क) स्वच्छता कार्यक्रम अहवाल**

**दिनांक ०६.०७.२०१९ महाविद्यालय परीसरात श्रमदान**

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालय परीसरात श्रमदानाचे आयोजन करण्यात आले. या श्रमदानात महाविद्यालयाच्या परीसरात चुरी पसरविण्याचे काम करण्यात येवुन अनावश्यक कचरा व झाडे झुडपांचे निर्मुलन करण्यात आले.

**उपस्थित संख्या –** या कार्यक्रमाला २०० विद्यार्थी उपस्थित होते.

**फलनिष्पत्ती –** श्रमदानाचे महत्व विद्यार्थ्यांना कळाले.

**दिनांक ०१.०८.२०१९ स्वच्छता शपथ कार्यक्रम**

महाविद्यालयाच्या परीसरात स्वच्छता पंधरवाडा दिनांक ०१ आगस्ट ते १५ आगस्ट या कालावधीत आयोजीत करण्यात आला. त्याची सुरवात म्हणून दिनांक ०१.०८.२०१९ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथिच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक लोणकर यांनी दिली. या कार्यक्रमाची प्राचार्य डॉ. शास्त्री सहकार्याक्रम अधिकारी प्रा. रविंद्र शेंडे तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व २५० विद्यार्थी उपस्थित होते.

**उपस्थित संख्या –** या कार्यक्रमाला २५० विद्यार्थी उपस्थित होते.

**फलनिष्पत्ती –** परीसर स्वच्छते मुळे आरोग्य चांगले राहते याची जाणीव झाली व याचा लाभ विद्यार्थी, समाज व महाविद्यालयाला लाभ मिळाला.

**दिनांक १३.०८.२०१९**

स्वच्छता पंधरवाडा निमित्य लोकमान्य महाविद्यालय व नगरपरीषद वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने लोकमान्य महाविद्यालय – राजीव गांधी चौक – सावरकर चौक – महात्मा गांधी चौक – नेहरू चौक – आंबेडकर चौक – नगरपरीषद वरोरा या मार्गाने स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात येऊन स्वच्छतेचे नारे व घोषणा दिल्या गेल्या त्याच बरोराबर रस्ता स्वच्छता मोहिमही हाती घेण्यात येऊन गांधी चौक ते आंबेडकर चौक या मार्गावर स्वच्छता व प्लास्टीक निर्मूलन मोहिम राबविण्यात आली. या प्रसंगी लोकमान्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुबोधकुमार सिंग, नगराध्यक्ष एहतेशाम अली, मुख्याधिकारी बल्लाळ साहेब तसेच नगरसेवक श्री. भागडे, भिवदरे, प्राध्यापक वृंद व विद्यार्थी उपस्थित होत या रॅलीचा समारोप नगरपरीषदेच्या सभागृहात करण्यात आला. या स्वच्छता रॅलीला गोंडवाना विद्यापिठाचे प्रकल्पगुरू डॉ. प्रमोद भुसारी यांनी भेट देऊन हिरवी झेंडी दाखविली.

**उपस्थित संख्या –** या कार्यक्रमाला ३०० विद्यार्थी उपस्थित होते.

फलनिष्पत्ती – विद्यार्थ्यान मध्ये स्वच्छतेचे महत्व लक्षात येऊन गावतही स्वच्छता ठेवली पाहिजे म्हणून परीसरात स्वच्छता उपक्रम राबविला गेला. याचा लाभ समाज, विद्यार्थी व महाविद्यालयाला मिळाला.

**१४ ऑगस्ट २०१९ श्रमदान**

स्वच्छता पंधरवाड्याचेच औचित्य साधुन महाविद्यालय परीसरातही श्रमदानाच्या माध्यमातून स्वच्छतेचे काम हाती घेण्यात आले. याप्रसंगी गाजर गवत, प्लास्टीक निर्मूलन कार्यक्रम हाती घेण्यात आला.

**०१.१०.२०१९ प्लास्टीक निर्मूलन शपथ**

लोकमान्य महाविद्यालय वरोरा व नगरपरीषद वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजन प्लॅस्टीक निर्मूलन कार्यक्रमाला हातभार लावण्यासाठी वरोरा शहरातही नगर परीषदेच्या

वतीने प्लॉस्टीक निर्मूलन कार्यक्रम राबविण्यात आला याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्लास्टीक निर्मूलनाची व उपयोग न करण्याची शपथ देण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयातील ४०० विद्यार्थी उपस्थित होते.

**उपस्थित संख्या –** या कार्यक्रमाला ४०० विद्यार्थी उपस्थित होते.

**फलनिष्पत्ती –** प्लॉस्टीक हे हानीकारक असून त्यामूळे धोका आहे. त्यामुळे त्याचा वापर टाळला पाहिजे याच जाणीव विद्यार्थ्यांना झाली तसेच रॅलीचा संदेश वरोरा गावात दिल्यामुळे त्याचा लाभ विद्यार्थी, समाज व महाविद्यालयाला झाला. तसेच महात्मा गांधीच्या विचारांची माहिती मिळाली.

**०२.१०.२०१९ महात्मा गांधी जयंती**

महात्मा गांधीचा स्वच्छतेचा संदेश लक्षात घेऊन आपला गाव, आपल शहर सुंदर करण्यासाठी प्लॉस्टीक निर्मूलन स्वच्छता रॅलीचे आयोजन, नगर परीषदेच्या वतीने करण्यात आले. या प्रसंगी उद्यान येथे गांधी प्रतिमेला मालार्पण करून मार्गदर्शन करून गांधी जयंतीचा कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी वरोऱ्यातील अनेक समाजसेवा संघटनाला आमंत्रित केल्या गेले. यात रोटरी क्लब वरोरा, गांधी उद्यान मंडळ, गुरूदेव सेवा मंडळ, महिला बचत गट इत्यादीना प्लास्टीचा वापर न करण्याची शपथ नगरपरीषदेच्या वतीने देण्यात येऊन त्याबाबत मुख्याधिकारी सुनिल बल्लके यांनी मार्गदर्शन केले. तसेच याप्रसंगी वरोऱ्यात प्लास्टीक निर्मूलन रॉलीचे आयोजन करण्यात येऊन रस्त्यावरील व परीसरातील प्लास्टीक गोळा करण्यात आले. या प्रसंगी नगरपरीषदेच्या वतीने विद्यार्थ्यांना व वरोरावासीयांनी कापडी पिशव्याचे वितरण करण्यात आले.

**उपस्थित संख्या –** या कार्यक्रमाला ४०० विद्यार्थी उपस्थित होते.

**फलनिष्पत्ती –** प्लॉस्टीक हे हानीकारक असून त्यामूळे धोका आहे. त्यामुळे त्याचा वापर टाळला पाहिजे याच जाणीव विद्यार्थ्यांना झाली तसेच रॅलीचा संदेश वरोरा गावात दिल्यामुळे त्याचा लाभ विद्यार्थी, समाज व महाविद्यालयाला झाला. तसेच महात्मा गांधीच्या विचारांची माहिती मिळाली.

**१९/०१/२०२० श्रमदान**

महाविद्यालयातील रा.से.यो. च्या वतीने १९.०१.२०२० रोजी महाविद्यालयात श्रमदानाचे आयोजन करून स्वच्छता करण्यात आली या प्रसंगी गाजर गवत व प्लास्टीक निर्मूलन तसेच वाढलेले गवत काढून परीसर स्वच्छ करण्यात आला.

**२५/०१/२०२० श्रमदान**

२६ जानेवारीचे महत्व लक्षात घेऊन महाविद्यालयातील व रा.से.यो. च्या विद्यार्थ्यांच्या वतीने परीसर स्पच्छता करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयातील परीसर तसेच महाविद्यालयातील बगीच्या येथे गवत निर्मूलन व प्लास्टीक उचलण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. श्रमदानानंतर विद्यार्थ्यासाठी मसाला भाताचे आयोजन श्रमपरीहार म्हणून करण्यात आले.

**उपस्थित संख्या –** या कार्यक्रमाला ४०० विद्यार्थी उपस्थित होते.

**फलनिष्पत्ती –** श्रमाचे व परीसर स्वच्छतेची महत्व विद्यार्थ्यांच्या लक्षात आली.

**(ड) व्यसनमुक्ती कार्यक्रम अहवाल**

**दिनांक ११/०७/२०१९ – तंबाखु व्यसनमुक्ती शपथ**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने तंबाखु व्यसनमुक्ती अभियानार्तगत Sambandh Helth Organization च्या वतीने विद्यार्थ्यासाठी तंबाखु व्यसनमुक्ती शपत कार्यक्रम विद्यार्थ्यासाठी आयोजीत करण्यात आला. या प्रसंगी २१० विद्यार्थी व विद्यार्थीनीना रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी यांनी शपथ दिली.

**उपस्थित संख्या –** या कार्यक्रमाला २१० विद्यार्थी उपस्थित होते.

**फलनिष्पत्ती –** व्यसन हे आरोग्यास हानी कारक आहे. त्यामुळे व्यसन करू नये असा संदेश विद्यार्थ्यांना मिळाला.

**दिनांक ०३/१२/२०१९**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने तंबाखु व्यसन मुक्ती अभियानार्तगत Pedge life या संस्थेच्या वतीने व Samldondh Health Foundation च्या वतीने व्यसनमुक्ती पासुन विद्यार्थ्यांना थांबविण्यासाठी व जनजागृती करण्यासाठी विद्यापीठस्तरीय एक दिवासीय कार्यशाळेचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग गडचिरोली विद्यापीठ गडचिरोली यांच्यावतीने सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर येथे करण्यात आले होते त्यामध्ये कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक लोणकर व श्री. राजेश शेंडे, श्री. आकाश उईके या स्वयसेवकांनी सहभाग घेतला.

**दिनांक ०५/१२/२०१९**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या तंबाखु व्यसन मुक्ती अभियानार्तगत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना व्यसन मुक्तीची शपथ देण्यात आली या प्रसंगी प्राचार्य प्राध्यापक व ४०० विद्यार्थी उपस्थित होते.

**(इ) विशेष शिबिर अहवाल (५ जाने २०२० ते ११ जाने २०२०)**

**रोगनिदान शिबिर व पूर्व तयारी**

दिनांक ०८ जाने २०२० रोजी शिबिराची पूर्व तयारी व माजरी वेकोली रूग्णालय माजरी यांच्या वतीने रोगनिदान शिबीराचे आयोजन गावकऱ्यांसाठी करण्यात आले होते. त्यात विविध आजारांची तपासणी करून गावकऱ्यांना मोफत औषध वितरण अंदाजे २०,०००/— रू. चे वेकोली कडून करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापक व ३० विद्यार्थी उपस्थित होते.

**उद्घाटन कार्यक्रम —**

वरोरा येथील लोकमान्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिराचे आयोजन दिनांक ०४ जाने ते ११ जाने २०२० या कालावधीत मौजा एकोणा येथे करण्यात आला. हे शिबिर आयोजीत करीत युवाशक्ती शिबीर या संकल्पनेवर आधारीत असून या शिबिरात ज्या स्वयसेवकाचा सहभाग होता. या शिबिराचे उद्घाटन दिनांक ०४ जाने २०२० रोजी दुपारी २.३० वा. घेण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुबोधकुमार सिंग हे असून उद्घाटक म्हणून सौ. सुवर्णरेखाताई पाटील (सदस्य महाविद्यालय विकास समिती व प्रसिध्द समाजसेविका) ह्या असून या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. श्रीकांतजी पाटील (अध्यक्ष लोकशिक्षण संस्था वरोरा) होते. याशिवाय सौ. सुनंदाताई जीवतोडे, सदस्य जि. प. चंद्रपूर, श्री. नितीनजी मत्ते माजी सदस्य जि. प. चंद्रपूर, सौ. रूपाताई पिजदुरकर (सरपंच) व उपसरपंच श्री. चंद्रशेखर पहापळे हे उपस्थित होते. त्याच बरोबर या कार्यक्रमाला लोकमान्य महाविलयाचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद व एकोना येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**श्रमदान —**

या सात दिवसीय शिबिरात ७५ स्वयंसेवक व गावकऱ्यांच्या सहभागातून गावातील मुख्य रस्त्यावरील सांडपाण्याची व्यवस्था लावण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूला ७६३ मीटर लांब व दीड फुट रूंद व एक फूट खोल नालीचे खोदकाम श्रमदानाच्या माध्यमातून करण्यात आले. तसेच माती उचलण्याचे कामही हाती घेऊन स्वच्छतेचा संदेश देण्यात आला.

**फलनिष्पत्ती —** श्रमदानातून श्रमाचे व स्वच्छतेचे महत्व विद्यार्थ्यांना व गावकऱ्यां कळाले त्याचा लाभ गावाला व विद्यार्थ्यांना झाला.

**बौध्दिक कार्यक्रम —**

या सातदिवसीय विशेष शिबिरात स्वयंसेवकाचा बौध्दिक व मानसिक विकास व्हावा या उद्देशाने दुपारी २ ते ४.३० या वेळेत बौध्दिक सत्राचे आयोजन करण्यात येऊन विविध विषयावर विविध व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले त्यात श्री. संदीप डाखरे यांचे महिला विषयक कायदे व सुरक्षा, श्री. गजानन दुशेट्टीवार यांचे 'युवतीना रोजगाऱ्याच्या संधी' श्री. मारोती वरभे यांचे कृषी विभागाच्या विविध योजनावर मार्गदर्शन', श्री. रूपेशजी घागी यांचे 'लोकशाही मूल्याच्या पुर्वस्थापणेत युवकांचे योगदान', श्री. रूपलालजी कांबळे यांचे 'राष्ट्रसंताचे विचार आणि ग्रामविकास', APPAS NGO यांच्या वतीने 'सर्वजनजागृती', श्री. गौतम घोडील व यशवंतनी सायरे यांच्या अंधश्रध्दा निर्मूलन व व्यसनमुक्ती, भगवान ढोल पथक यांचे कडून आत्मरक्षा प्रशिक्षण शिबिरात संच विद्यार्थ्याची गटचर्चा इत्यादी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

**फलनिष्पत्ती —** बौध्दिक कार्यक्रमामुळे अनेक नविन विषयाची माहिती विद्यार्थ्यांना तसेच गावकऱ्यांना मिळाली व ज्याचा लाभ गावकरी व विद्यार्थ्यांना झाला.

**सांस्कृतिक कार्यक्रम –**

सामाजिक अंधश्रध्दा, अनिष्ट चालीरीती रूढी प्रथा परंपा सामाजीक समस्या इतर विषयी जनजागृती होण्यासाठी दैनंदिन सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन रात्री ८ ते १० या वेळात करण्यात आले यात रा.से. यो. कला पथकाच्या वतीने लुघनाटीका, लोकगिते, एकाकीका सादर केल्या तर 'मोबाईलचे दुषपरीणाम, हुडाबळी, हागणदारी मुक्त गाव, शोष खड्डे शेतकरी आत्महत्या, व्यसनाधिनता स्त्री शिक्षण इ. विषयावर सादकीकरण करण्यात आले तसचे दिनांक ०५ जाने संध्याकाळी गावकऱ्याच्या भजनाचा कार्यक्रम, ०७ जाने ला शिवछत्रपती कला प्रबोधन मंडळ दहेगाव यांच्या नकलांचा कार्यक्रम दिनांक ०८ जानेवारी रोजी श्री. वसंतजी कुंभारे यांचे शैक्षणिक जानजागृतीवर किर्तन, ०९ जाने रोजी जि. प. प्रा. शाळा एकोणा यांचा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**फलनिष्पत्ती –** सांस्कृतीक कार्यक्रमाच्या माध्यमातून जनजागृती होऊन गावकऱ्यांना त्याची माहिती मिळाली तसेच शिबिरार्थी व गावकऱ्यांना त्याचा लाभ झाला.

**समारोप –**

राष्ट्रीय सेवा योजनेचा ७ दिवसीय विशेष शिबिराचा समारोपीय कार्यक्रम दिनांक ११ जाने २०२० रोजी शनिवारच्या सकाळी १०.०० वा. आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचा अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुबोधकुमार सिंग हे होते तर प्रमुख उपस्थिती मा. खासदार श्री. बाळुभाऊ धानोरकर (खासदार चंद्रपूर, वणी–आर्णी लोकसभा क्षेत्र) यांची असुन श्री. गुप्ता साहेब जनरल मॅनेजर वेकोली तसेच सरपंच रूपाताई पिजदुरकर, उपसरपंच श्री. पहापळे, मुख्याध्यापक श्री. बेलकर, श्री. गुणानी बोढे तसेच लोकमान्य महाविद्यालयाचे प्राध्यापक शिक्षकेवर कर्मचारी वृंद व गावकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या विशेष शिबिराच्या माध्यमातून रू. ६५३४०/– इतके मूल्याचे काम करण्यात आले.

**(ई) विद्यापीठ व राज्यस्तरीय शिबिर –**

१) दिनांक १७ जानेवारी २०२० ते २३ जानेवारी २०२० रोजी शिवाजी महाविद्यालय, राजूरा च्या वतीने राज्यस्तरीय शिबिराचे आयोजना मौजा सुब्बई ता. राजुरा येथे करण्यात आले होते त्यात महाविद्यालयाचे (१) आकाश ब्रम्हदेव उइके (२) विठ्ठल राजु क्षिरसमुद्रकर हे विद्यार्थी सहभागी झाले होते.

२) आनंदनिकेतन महाविद्यालय वरोऱ्याच्या वतीने दिनांक २१ जानेवारी २०२० ते २७ जानेवारी २०२० या कालावधीत विद्यापीठ स्तरीय शिबिराचे आयोजन आनंदवन येथे करण्यात आले होते त्यात महाविद्यालयाचे (१) राजेश लिलाधर शेंडे, (२) चेतन गजानन मेश्राम, (३) दिपक ज्ञानेश्वर घोसरे (४) आकाश अरूण देहारकर हे विद्यार्थी सहभागी झाले होते.

तेव्हा वरील उद्दीष्टपूर्तीसाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून वर्षभर कार्यक्रमाचे आयोजन केल्या गेले. त्यात बऱ्याच प्रमाणात विद्यार्थीनी सहभाग नोंदवून आपला समाज सेवेचा वाटा या माध्यमातून देण्याचा प्रयत्न केला. तसेच त्याच्यातही समाजजागृती व देशसवेची जाणीव निर्माण होऊण आपणही समाजाचा एक भाग असल्यामुळे आपणही काही दिले पाहिजे. ही वृत्ती रा. से. यांच्या माध्यमातून त्याच्यात निर्माण होऊन ह्या भावनेने पुढील काळात त्यांनी कार्य करण्याचे भावना निर्माण झाली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या या वार्षिक कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुबोधकुमार सिंग यांचे मार्गदर्शन तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे व विद्यार्थ्याचे सहकार्य लाभले.

छायाचित्रे व बातमी :लोकमान्य महाविद्यालय वरोरा जि. चंद्रपूर राष्ट्रीय सेवा योजना **(2019-2020)**







राष्ट्रीय सेवा योजना
राष्ट्रीय सेवा योजना दिन


लोकमान्य महाविद्यालय, वरोरा
राष्ट्रीय सेवा योजना
रक्तदान शिबिर
Latitude: 20.234553
Longitude: 79.000419
Accuracy: 20.0m
Time: 06-12-2019 10:35
Note: blood donation camp nss


लोकमान्य महाविद्यालय
जागतिक हृदय दिन


Latitude: 20.234746
Longitude: 79.000106
Elevation: 197.84m
Accuracy: 3.2m
Time: 01-10-2019 10:00
Note: lokmanya mahavidyalaya campus plastic nirmulan shapath


लोकमान्य महाविद्यालय, वरोरा
राष्ट्रीय सेवा योजना
विशेष शिबिर


लोकमान्य महाविद्यालय, वरोरा
राष्ट्रीय सेवा योजना
विशेष शिबिर






लोकमान्य महाविद्यालय, वरोरा
राष्ट्रीय सेवा योजना
विशेष शिबिर


जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा एकोणा.
लोकमान्य महाविद्यालय
राष्ट्रीय सेवा योजना व गृहअर्थशास्त्र विभाग
मास्क वितरण कार्यक्रम
व
'कोरोना' जनजागृती मोहीम



# लोकमान्य महाविद्यालयात महात्मा गांधी जयंती व प्लॅस्टीक निर्मूलन रॅलीचे आयोजन

प्रतिनिधी / ६ ऑक्टोबर

**वणी** / लोकमान्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक २ ऑक्टोबर २०१९ रोजी महात्मा गांधी यांच्या १५० जयंतीनिमित्त महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती महाविद्यालयात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुबोधकुमार सिंह व प्रमुख अतिथी म्हणून रविंद्र शेंडे हे उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्ष डॉ. सुबोधकुमार सिंह यांनी आपले विचार व्यक्त ... सिद्धांतपुरुष असून त्यांच्या कार्यामुळे व विचारामुळे समाजात जागृती घडून आली असे सांगितले व प्लॅस्टीकमुळे होणारे परिणाम विषद केले, तर प्रमुख अतिथी प्रा. शेंडे सर यांनी महात्मा गांधींचे आर्थिक विचार व्यक्त करून त्याची आजच्या काळातील आवश्यकता प्रतिपादन केली. या कार्यक्रमाचे संचालन व आभार ... कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक लोणकर यांनी केले. या कार्यक्रमानंतर लोकमान्य महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना पथक, नगरपरिषद वरोरा, महिला बचत गट व रोटरी क्लब व गुरुदेव सेवा मंडळ वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता व प्लॅस्टीक निर्मूलन अभियान रॅलीचे आयोजन गांधी उद्यानातून करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना व गावकऱ्यांना प्लॅस्टीक निर्मूलन व स्वच्छतेची शपथ देण्यात आली व त्यानंतर रॅली ही आंबेडकर चौक, गांधी चौक, ... चौक या मार्गाने नगरपरिषद येथे विसर्जित करण्यात आली. ... प्लॅस्टीक निर्मूलनासंबंधी पत्रक वाटण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक लोणकर, रविंद्र शेंडे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी ... सर, डॉ. ... कोटेवार, ... तसेच रोटरी क्लबचे अध्यक्ष अमीत नाहर, ... विजय पावडे, समीर ..., ... मते, पलीवार व पदाधिकारी उपस्थित होते. तसेच गुरुदेव मंडळाचे गणे व ... मोठ्या प्रमाणात महिला प्रतिनिधी उपस्थित होते.



# लोकमान्य महाविद्यालय एकोणा येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर

... शिबिराचा उद्घाटन कार्यक्रम ५ जानेवारी २०२० रोज रविवारला दुपारी २.३० वाजता घेण्यात आला.

या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुबोधकुमार सिन्हा ... उद्घाटक म्हणून ... प्रमुख पाहुणे म्हणून ... सुनंदा ... एकोणाच्या सरपंच रूपा ..., उपसरपंच ... हे प्रमुख्याने उपस्थित होते.

तसेच लोकमान्य महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद आणि एकोणा येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सातदिवसीय विशेष शिबिरात ७५ स्वयंसेवक व गावकऱ्यांच्या सहभागातून गावातील मुख्य रस्त्यावरील सांडपाण्याची व्यवस्था लावण्यासाठी रस्त्याच्या बाजूला ७६८ मीटर लांबी व एक फूट रुंद नालीचे खोदकाम करण्यात आले. तसेच सातदिवसीय विशेष शिबिरात स्वयंसेवकाचा बौद्धिक, मानसिक विकास व्हावा या दृष्टीने रोज दुपारी २ ते ४ या वेळेत बौद्धिक सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या बौद्धिक सत्रात ... डाखरे, गजानन दुधेड्डीवार, मारोती भरभे, ... रूपलालजी ..., ... पोहीले, ... सावरे व ... ढोल पथक ... विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. समाजातील व्यसनाधिनता, अंधश्रद्धा, अनिष्ट चालिरिती रूढी, प्रथा व परंपरा याविषयी जनजागृती व्हावी या उद्देशाने सातदिवसीय विशेष शिबिरात दैनंदिन सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सांस्कृतिक कार्यक्रमात लघुनाटिका, लोकगीते, एकांकीका सादर करण्यात आल्या.

त्यात 'मोबाईलचे दुष्परिणाम हागणदारी मुक्त ... शोषखड्डे अभियान' ... लघुनाटिका सादर करण्यात आल्या.

# लोकमान्य महाविद्यालय, वरोरा,
## जी-चंद्रपूर
# राष्ट्रीय सेवा योजना
# दैनंदिन कार्यक्रम आणि विशेष शिबीर अहवाल
**(सत्र २०२१-२०२२)**

प्रति,
संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय:- राष्ट्रीय सेवा योजना दैनंदिन कार्यक्रम आणि विशेष शिबीर अहवाल स्वीकारणेबाबत.
संदर्भ:- पत्र क्र. गोवि/रासेयो/३५/२०२२ दिनांक २५/०५/२०२२
महोदय;

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक महाविद्यालयात कार्यरत आहे. सध्या या एककात १५० स्वयंसेवक आहेत. ऑक्टोबर २०२१ पर्यंत रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणून डॉ. जयश्री शास्त्री व सह-कार्यक्रम अधिकारी म्हणून डॉ. दीपक लोणकर यांनी जबाबदारी पार पाडली. ऑक्टोबर २०२१ पासून रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणून डॉ. तानाजी माने व सह-कार्यक्रम अधिकारी म्हणून डॉ. रवींद्र शेंडे काम पाहतात. सत्र २०२१-२०२२ मध्ये महाविद्यालयातील रासेयोच्या दैनंदिन कार्यक्रमातंर्गत ऑनलाईन व ऑफलाईन कार्यक्रम घेण्यात आले. त्यात प्रामुख्याने २४ सप्टेंबर राष्ट्रीय सेवा योजना दिन, वृक्षारोपण, कोविड लसीकरण, रक्तदान शिबीर इत्यादी उपक्रमाचा उल्लेख करता येईल. तर रासेयो विशेष शिबिराचे आयोजन दि.२०/०३/२०२२ ते २६/०३/२०२२ या कालावधीत मौजा करंजी या गावी घेण्यात आले. या विशेष शिबिरात प्रामुख्याने श्रमदान, बौद्धिक कार्यक्रम, रोगनिदान शिबीर, स्वच्छता विषयक कार्यक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचा उल्लेख करता येईल. तरी राष्ट्रीय सेवा योजनेच्या दैनंदिन कार्यक्रमाचा आणि विशेष शिबिराचा सविस्तर अहवाल आपणास सादर करीत आहोत.

| | | |
|---|---|---|
| डॉ. तानाजी माने | डॉ. रवींद्र शेंडे | डॉ. सुबोधकुमार सिंह |
| रासेयो कार्यक्रम अधिकारी | रासेयो सह-कार्यक्रम अधिकारी | प्राचार्य, लोकमान्य महाविद्यालय वरोरा |

## १) ४ सप्टेंबर २०२१– सामाजिक ऐक्य आणि राष्ट्र विकास :–






सामाजिक ऐक्य पंधरवडा निमित्त महाविद्यालयातील रासेयोच्या वतीने सामाजिक ऐक्य आणि राष्ट्र विकास या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन दि ४ सप्टेंबर २०२१ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुबोधकुमार सिंह होते, तर प्रमुख वक्ता म्हणून प्रा. प्रदीप चापले (नोडल अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली) हे होते. प्रमुख वक्ता प्रा. प्रदीप चापले यांनी आपल्या मार्गदर्शन भाषणातून सामाजिक ऐक्य निर्मितीत राष्ट्रीय सेवा योजना महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे, असे मत मांडले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुबोधकुमार सिंह यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनाची भूमिका मांडली. या कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. जयश्री शास्त्री यांनी केले तर आभार रासेयो सह-कार्यक्रमाधिकारी डॉ. दीपक लोणकर यांनी मानले. या कार्यक्रमात ऑनलाईन ३९ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला .

२) दि. २४ सप्टेंबर २०२१ – राष्ट्रीय सेवा योजना दिन :–






२४ सप्टेंबर २०२१ राष्ट्रीय सेवा योजना दिना निमित्त महाविद्यालयातील रासेयोच्या वतीने युवकांच्या जडणघडणीत राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुबोधकुमार सिंह होते, तर प्रमुख वक्ता म्हणून प्रा. गुरुदास बल्की (कार्यक्रम अधिकारी रासेयो, श्री. शिवाजी महाविद्यालय, राजुरा) हे होते. प्रमुख वक्ता प्रा. गुरुदास बल्की यांनी आपल्या मार्गदर्शन भाषणातून युवकानांवर संस्काराचे व्यासपीठ म्हणून राष्ट्रीय सेवा योजना महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे, असे मत मांडले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुबोधकुमार सिंह यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनाची भूमिका मांडली. या कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. जयश्री शास्त्री यांनी केले तर आभार रासेयो सह-कार्यक्रमाधिकारी डॉ. दीपक लोणकर यांनी मानले. या कार्यक्रमात ऑनलाईन ३५ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

## ३) दि ०२/१०/२०२१ राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती :-



०२ ऑक्टोबर २०२१ राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयातील रासेयोच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुबोधकुमार सिंह होते. तर प्रमुख वक्ता म्हणून महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. तानाजी माने होते . प्रमुख वक्ता प्रा. प्रा. तानाजी माने यांनी आपल्या मार्गदर्शन भाषणातून महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या भारताच्या जडणघडणीतील योगदानाबाबतची माहिती दिली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुबोधकुमार सिंह यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनाची भूमिका मांडली. या कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. जयश्री शास्त्री यांनी केले तर आभार रासेयो सह-कार्यक्रमाधिकारी डॉ. दीपक लोणकर यांनी मानले

## ४) दि - १३/१०/२०२१ - माझी वसुंधरा अंतर्गत वृक्षारोपण :-



१३ ऑक्टोबर २०२१ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने माझी वसुंधरा अंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाच्या परिसरात प्लास्टिक कुंडीत व बकेटात वृक्षारोपण केले. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुबोधकुमार सिंह, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. जयश्री शास्त्री आणि सह-कार्यक्रमाधिकारी डॉ. दीपक लोणकर यांचे मार्गदर्शन लाभले. तर या वृक्षारोपण कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या ३५ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. या वेळी एकूण ३५ झाडे लावण्यात आले.

५) दि - २९/१०/२०२१ – कोविड-१९ लसीकरण शिबीर :-






वरोरा येथील स्थानिक लोकमान्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना,विद्यार्थी विकास विभाग, उपजिल्हा रुग्णालय, वरोरा आणि मिशन युवा स्वास्थ अंतर्गत दिनांक २९ ऑक्टोबर २०२१ रोजी एक दिवसीय कोविड-१९ लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. सुबोध कुमार सिंह यांनी या शिबिराच्या आयोजनामागची भूमिका आणि लसीकरणाचे महत्त्व आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी उपजिल्हा रुग्णालय, वरोरा येथील डॉ. सुजाता काटकर, श्री.येडे, पिंपळशेंडे मॅडम, श्री. अमोल भोंग यांचे मार्गदर्शन लाभले.या लसीकरण शिबिरात 18 वर्षावरील पन्नास(५०) विद्यार्थ्यांनी लस घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयातील रासेयोचे समन्वयक प्रा. तानाजी माने तर आभार डॉ. लोणकर यांनी केले.

६) दि - २६/११/२०२१ - संविधान दिन :-







महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ रोजी संविधान दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुबोधकुमार सिंह यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला आभिवादन करून झाली. या प्रसंगी संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुबोधकुमार सिंह यांनी आपल्या भाषणातून भारतीय संविधानाचे महत्व आणि राष्ट्र विकासातील संविधानाचे असलेले स्थान यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. तानाजी माने यांनी केले तर आभार डॉ. दीपक लोणकर यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षेत्तर कर्मचारीवृंद उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाला महाविद्यालयातील बी.ए., बी.कॉम आणि बी एस्सीचे एकूण २०० विद्यार्थी उपस्थित होते.

**७) दि - ०२ डिसेंबर व १८ डिसेंबर २०२१ - स्वच्छता कार्यक्रम :-**






महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि - ०२ डिसेंबर व १८ डिसेंबर २०२१ या दोन दिवशी महाविद्यालयाच्या परिसरात स्वच्छता कार्यक्रम राबविण्यात आला. रासेयो स्वयंसेवकांना स्वच्छतेचे महत्व समजावे या ऊद्देशातून हा कार्यक्रम घेण्यात आला. यात महाविद्यालय परिसरातील प्लास्टिक निर्मूलन, महाविद्यालयाच्या परिसरातील नाली सफाई आणि गाजर गवताचे निर्मूलनाचा उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुबोधकुमार सिंह, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. तानाजी माने रासेयो सह-कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र शेंडे, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद यांचे मार्गदर्शन लाभले. या स्वच्छता कार्यक्रमात रासेयोच्या १५० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

### ८) दि - १२ जानेवारी २०२२ - राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती:-





महाविद्यातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. १२ जानेवारी २०२२ रोजी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष्यस्थानी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. तानाजी माने होते. तर प्रमुख वक्ता म्हणून रासेयो सह-कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र शेंडे हे होते. प्रमुख वक्ता डॉ. शेंडे यांनी आपल्या भाषणातून राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विचार व कार्याची माहिती दिली. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**९) रासेयो स्वयंसेवक नोंदणी (डिसेंबर २०२१ ते जानेवारी २०२२):-**

राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन, मुबई यांच्या निर्देशानुसार डिसेंबर २०२१ ते जानेवारी २०२२ या कालावधीत या वेब पोर्टलवर महाविद्यालयातील रासेयोच्या १५० पैकी १४० स्वयंसेवकांची नोंदणी करण्यात आली. (उर्वरित १० रासेयोच्या स्वयंसेवकांची नोंदणीचे काम सुरु आहे) तसेच महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांकडून 'माझी वसुंधरा'ची प्रतिज्ञा घेऊन ई-प्रमाणपत्र आणि दोन वृक्ष लावतानाचे फोटो उपलोड करण्यात आले आहेत. यासंदर्भात रासेयो समन्वयक, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीच्या दोन्ही आभासी बैठकीत (दि. - १८ डिसेंबर व २९ डिसेंबर २०२१) महाविद्यालयाच्या रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला आहे.


१०) १४ जानेवारी २०२२ – सूर्यनमस्कार:-




१४ जानेवारी २०२२ मकर संक्रांतीच्या निमित्ताने आयुष मंत्रालय, भारत सरकार(संदर्भ पत्र क्र. अ. शा. पी. २४-१/रासेयो/निदेश/२०२१/१०-२५ दि. १० जानेवारी २०२१) आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली (संदर्भ पत्र क्र.गोवि/रासेयो/१५/२०२२ दि. ११/०१/२०२२) यांच्या निर्देशानुसार महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या वतीने सूर्यनमस्कार उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम कोविड-१९ च्या नियमाचे पालन करून घेण्यात आला. या कार्यक्रमात रासेयोचे स्वयंसेवक आणि शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे खेळाडूंनी सहभाग घेत सूर्यनमस्कार केले. हा कार्यक्रम रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा. तानाजी माने आणि शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे संचालक प्रा. उत्तम देऊळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

## ११) २५ जानेवारी २०२२- राष्ट्रीय मतदार दिन:-







वरोरा येथील लोकमान्य महाविद्यालयात गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या संदर्भ पत्र क्र. गोवि/रासेयो/१४/२०२२ दि.०७/०१/२०२२ नुसार दिनांक २५ जानेवारी १९५० या दिवशी "राष्ट्रीय मतदार दिन" निमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व रासेयोच्या स्वयंसेवकांना 'लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ' गुगल फॉर्मच्या आधारे घेण्यात आली. महाविद्यालयातील रासेयो विभागाद्वारे गुगल फॉर्म तयार करून 'मतदानाची शपथ' अपलोड करून रासेयो स्वयंसेवकांकडून आणि विद्यार्थ्यांकडून वरील शपथेचे वाचन करून घेण्यात आले. या शपथेच्या वाचनानंतर स्वयंसेकांना व विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमात रासेयोच्या आणि महाविद्यालयाच्या एकूण २२४ स्वयंसेवक/ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुबोधकुमार सिंह, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. तानाजी माने आणि रासेयो सह-कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र शेंडे यांचे मार्गदर्शन लाभले.

## १२) ८ फेब्रुवारी २०२२ - सूर्यनमसकार यज्ञ:-










# देशोन्नती

## उत्तम शरीर स्वास्थासाठी सूर्यनमस्कार आवश्यक : नामदेव कोल्हे

**देशोन्नती वृत्तसंकलन...**

खांबाडा : रथसप्तमी च्या निमित्ताने वरोरा येथील लोक शिक्षण संस्थेच्या परिसरात सूर्यनमस्कार यज्ञाचे आयोजन करण्यात आले

यावेळी तब्बल ७०० विद्यार्थ्यांचा सहभाग घेतला. सूर्याच्या उपासनेमुळे अनेक आजार बरे होण्यास मदत होते. आधुनिक युगात माणसाचे जीवन यंत्रवत झाले असून जगभरातील अनेक जण नैराश्याच्या खाईत लोटले जात आहेत. सूर्यनमस्कारामुळे मनुष्याची इंद्रिय सक्षम होण्यास मदत होते, त्यामुळे नैराश्यावर मात करण्याकरिता आणि शरीर स्वास्थ्यासाठी सूर्यनमस्कार आवश्यक असल्याचे प्रतिपादन लोक सेवा मंडळ, भद्रावती चे सचिव नामदेव कोल्हे यांनी केले. वरोरा येथील लोक शिक्षण संस्थेच्या परिसरात रथसप्तमी च्या निमित्ताने सूर्यनमस्कार यज्ञाचे आयोजन मंगळवार ला करण्यात आले होते, त्या निमित्ताने ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर लोकशिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा श्रीकांत पाटील आणि कार्यवाह श्रीकृष्ण घड्याळ पाटील यांची उपस्थिती होती. आपल्या प्रतिपादनात कोल्हे यांनी भारतीय संस्कृतीचे दाखले देत सूर्यनमस्कार ही प्राचीन व्यायाम पद्धती आहे असे सांगत या शास्त्रशुद्ध व्यायाम पद्धतीचा आढावा घेतला. शरीर, मन, बुद्धी, आत्मा आणि चेतना याचा सर्वांनी सर्वांगीण विचार सूर्यनमस्कारात केला आहे. असे ते म्हणाले. देशाच्या ७५ च्या स्वातंत्र्य अमृत महोत्सवाच्या निमित्ताने मोठ्या संख्येने योग उपासकांनी सूर्यनमस्कार यज्ञात भाग घेतल्याबद्दल त्यांनी सर्वांचे अभिनंदन केले. याप्रसंगी बोलताना श्रीकृष्ण घड्याळपाटील यांनी देशाच्या सूर्यनमस्कार संकल्पात लोक शिक्षण संस्थेच्या उपासकांनी खारीचा वाटा उचलत ४५००० सूर्यनमस्कार घातले. सूर्य उपासनेमुळे बलतेज प्राप्त होत असून सूर्य उपासनेला दैनंदिन जीवनात स्थान मिळाले पाहिजे असे ते म्हणाले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य श्रीकांत पाटील यांनी भारतीय संस्कृती कृतज्ञतेची आहे. सूर्य ऊर्जादाता असून त्याची उपासना घरोघरी नित्य क्रमाने झाली तर तरुण पिढी बलदंड होईल असे ते म्हणाले. याप्रसंगी व्हॉलीबॉल आणि बॅडमिंटन खेळात विभाग स्तर, राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावर प्राविण्य प्राप्त केलेल्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. लोक शिक्षण संस्थेच्या ७०० विद्यार्थी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या सूर्यनमस्कार यज्ञात सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांनी याप्रसंगी त्रिपुर सुंदरी स्तोत्र, सूर्याष्टकम् आणि रामाष्टकम स्तोत्राचे पठण करून उपस्थितांची मने जिंकली. योग प्रेमींसाठी सदर कार्यक्रम फेसबुक लाईव्ह करण्यात आला होता त्यात अनेक योग साधकांनी याचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्लेषा भट हिने केले. प्रास्ताविक प्रीती दातारकर तर आभार संजीवनी फुलझेले हिने मानले. गायत्री निखाडे यांनी स्तोत्रांचा अर्थ सांगितला.

Chandrapur Edition
Feb 9, 2022 Page No. 8
Powered by : eReleGo.com

**सूर्यनमस्कार यज्ञ कार्यक्रम अहवालः-**

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग आणि चंद्रपूर जिल्हा योग असोशिएशन, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ फेब्रुवारी २०२२ रोजी सूर्यनमस्कार यज्ञाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त ७५ कोटी सूर्यनमसकार या अभियानाचा भाग म्हणून १ फेब्रुवारी २०२२ पासून महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद आणि विद्यार्थ्यांसाठी उभ्या स्थितीतील व खुर्चीवरील सूर्यनमसकाराचे प्रात्यक्षिक घेण्यात आले.

दिनांक ०८ फेब्रुवारी २०२२ रोजी सूर्यनमसकार यज्ञाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्रा. श्रीकांतजी पाटील (अध्यक्ष, लोकशिक्षण संस्था, वरोडा) प्रमुख मार्गदर्शक मा.श्री. नामदेव कोल्हे (सचिव, लोकसेवा मंडळ, भद्रावती) प्रमुख उपस्थति मा. श्रीकृष्णाजी घड्याळपाटील (कार्यवाह,लोकशिक्षण संस्था, वरोडा) आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात सुरुवातीला लोकशिक्षण संस्था सांचलित विविध युनिटच्या निवडक ७०० विद्यार्थ्यांनी (७५ रासेयो स्वयंसेवक) १३ सूर्यनमस्कार घातले. तसेच प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी खुर्चीवरील सूर्यनमस्कार घातले. सूर्यनमस्कारानंतर मान्यवरांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

१३) ०८ फेब्रुवारी २०२२ - लोकशाही पंधरवडा (२६ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०२२):-













**०८ फेब्रुवारी २०२२ - लोकशाही पंधरवडा कार्यक्रम अहवाल:-**

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या संदर्भ पत्र गोवि/रासेयो/३१/२०२२ दिनांक २८/०१/२०२२ यानुसार लोकशाही पंधरवडा निमित्त दिनांक ०८ फेब्रुवारी २०२२ रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा केला जातो. याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने "नगर विकासात नागराध्यक्षाची भूमिका" या विषयावर व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.सौ. सुवर्णरेखाताई पाटील (सदस्य, महाविद्यालय विकास समिती, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा) प्रमुख मार्गदशक म्हणून मा. आहेतेश्याम अली (माजी नगराध्यक्ष, नगरपरिषद वरोरा) आणि स्वागताध्यक्ष म्हणून डॉ. सुबोधकुमार सिंह (प्राचार्य, लोकमान्य महाविद्यालय,वरोरा) हे उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख मार्गदशक म्हणून मा. आहेतेश्याम अली यांनी आपल्या भाषणातून नागराध्यक्ष्यांनी दूरदृष्टी ठेऊन विकासाला प्राधान्य दिले पाहिजे. तसेच लोकशाही मजबूत बनविण्यासाठी अधिकाधिक युवकांनी मतदानाच्या अधिकाराचा वापर करणे आवश्यक आहे, असे मत मांडले.तर या कार्यक्रमाच्या अध्यक्ष मा.सौ. सुवर्णरेखाताई पाटील यांनी भाषणातून सशक्त लोकशाहीसाठी महिलांचे सबलीकरण होणे गरजेचे आहे, असे मत मांडले. तर स्वागताध्यक्ष डॉ. सुबोधकुमार सिंह यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणातून कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका मांडली. या कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्यकर्माधिकारी डॉ. तानाजी माने यांनी केले. तर आभार रासेयो सह-कार्यकर्माधिकारी डॉ. रवींद्र शेंडे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद आणि रासेयोचे १४० स्वयंसेवक उपस्थित होते.

## १४) १९ फेब्रुवारी २०२२ - छत्रपती शिवाजी महाराज जयंती :-





महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास विभागाच्या सयुंक्तविद्यमाने १९ फेब्रुवारी २०२२ रोज रविवारी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुबोधकुमार सिंह (प्राचार्य, लोकमान्य महाविद्यालय,वरोरा) हे उपस्थित होते. तर प्रमुख मार्गदशक म्हणून मा.प्रा डॉ. जयंत काकडे(इतिहास विभागप्रमुख, विवेकांनद महाविद्यालय, भद्रावती) प्रा डॉ. जयंत काकडे यांनी आपल्या भाषणातून छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते, त्यांचे विचार युवकांनी आत्मसात करणे आवश्यक आहे, असे मत मांडले. तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुबोधकुमार सिंह यांनी भाषणातून छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात स्वधर्म आणि स्वसंस्कृतीबाबत अस्मिता निर्माण करण्याचे महान कार्य केले आहे, असे मत मांडले. या कार्यक्रमाचे संचालन इतिहास विभागप्रमुख डॉ. दीपक लोणकर यांनी केले. तर आभार रासेयो सह-कार्यकर्माधिकारी डॉ. रवींद्र शेंडे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद आणि रासेयोचे २० स्वयंसेवक उपस्थित होते.


## १५) ०५ मार्च २०२२ - रक्तदान शिबिर :-









**रक्तदान शिबिर अहवाल:-**

वरोरा येथील स्थानिक लोकमान्य महाविद्यालयात ०५ मार्च २०२२ रोज शनिवारला रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबीर राष्ट्रीय सेवा योजना, उप-जिल्हा रुग्णालय, वरोरा आणि रक्त संक्रमण केंद्र, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले. या शिबिराच्या सुरुवातीला छोटेखानी उदघाटन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुबोधकुमार सिंह हे होते. तर प्रमुख उपस्थिती श्री. जयवंत पचारे (रक्त संक्रमण केंद्र, चंद्रपूर) व सौ. राजश्री मेंढे (वैद्यकीय अधिकारी , उप-जिल्हा रुग्णालय, वरोरा) श्री.पचारे यांनी आपल्या मार्गदरशांपर भाषणातून रक्तदानाचे महत्व सांगितले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुबोधकुमार सिंह यांनी या शिबिराच्या आयोजनाची भूमिका आपल्या अध्यक्षीय भाषणातून सांगितली. या उदघाटन कार्यक्रमाचे संचालन रासेयो  कार्यक्रमाधिकरी डॉ. तानाजी माने यांनी केले तर आभार रासेयो  सह-कार्यक्रमाधिकरी डॉ. रवींद्र शेंडे यांनी मांडले.

या छोटेखानी उदघाटन कार्यक्रमानंतर रक्तदान शिबिराला सुरवात झाली. यात एकूण २२ रक्तदात्यांनी केले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी,उप-जिल्हा रुग्णालय, वरोराचे श्री. विक्की भगत, श्री. अमोल भोंग आणि रक्त संक्रमण केंद्र, चंद्रपूरचे कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले.

**Blood Donor List :-**

| Sr. No. | Name of Blood Donor | Gender | Blood Group |
|---|---|---|---|
| 1 | Shri. Mahesh Nagapure | M | B+ |
| 2 | Shri. Rohit Chamate | M | B+ |
| 3 | Shri. Aniket Tarkar | M | B+ |
| 4 | Shri. Pranav Kumare | M | A+ |
| 5 | Shri. Nilesh Kurekar | M | A+ |
| 6 | Shri. Suraj Bodhe | M | O+ |
| 7 | Ku. Pallavi Butte | F | A+ |
| 8 | Shri. Tanaji Mane | M | B- |
| 9 | Shri. Yeshu Kongare | M | O+ |
| 10 | Shri. Shubham Tajane | M | A- |
| 11 | Shri. Prakash Devalkar | M | O+ |
| 12 | Shri. Shubham Mankar | M | B+ |
| 13 | Shri. Ashisha Kamadi | M | O+ |
| 14 | Shri. Ganesh Chanbhare | M | B+ |
| 15 | Shri. Tejas Madavi | M | AB+ |
| 16 | Shri. Prashant Asutkar | M | O+ |
| 17 | Shri. Amol Kale | M | O+ |
| 18 | Ku. Sujita Dhok | M | A+ |
| 19 | Sau. Prachi Kannao | F | O+ |
| 20 | Ku. Shubhangi Kale | F | AB+ |
| 21 | Shri. Ashish Garghate | M | B+ |
| 22 | Shri. Vithal Kshirsmudrakar | M | B+ |

## १६) ०८ मार्च २०२२ - जागतिक महिला दिनः-







लोकमान्य महाविद्यालयातील लो. शि. मं., म. अ. व से. कें.,राष्ट्रीय सेवा याेजना आणि गृहअर्थशास्त्र विभागाच्या वतीने ८ मार्च २०२२ ला जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुबोधकुमार सिंह तर प्रमुख उपस्थिती सौ. सुवर्णरेखाताई पाटील (सदस्या, म. वि. स.,लो. म., व.) आणि सौ.भावना लोया (सचिव ,बार अ.,वरोरा) यांची होती. व्याख्याते सौ. लोया यांनी वर्तमान परिस्थितील कौटुंबिक हिंसाचाराची समस्या व ती दूर करण्यासाठी कोणते कायदे आहेत, याची माहिती दिली. तसेच सौ. सुवर्णरेखाताई पाटील यांनी भारतीय कुटुंब पद्धतीमध्ये झालेला बदलाबाबत आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुबोध कुमार सिंह यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून भारतीय महिलांची विविध क्षेत्रातील प्रगती आकडेवारीनुसार सांगितली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अल्का कुलकर्णी,प्रास्ताविक प्रा. भावना जानवे यांनी केले. तर आभार प्रा. वर्षा बल्की यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**१७) १४ एप्रिल २०२२- महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती:-**







गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीच्या संदर्भ पत्र क्र. गोवि/रासेयो/८५/२०२२ दिनांक २३/०३/२०२२ नुसार महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक १४ एप्रिल २०२२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती यांची १३१ वी जयंती व स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्य 'संविधानाचा जागर' या उपक्रमातंर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील प्रा.उत्तम देऊळकर (संचालक, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग) तर प्रमुख वक्ता म्हणून डॉ. दीपक लोणकर (इतिहास विभाग प्रमुख) हे होते. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन आणि संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

प्रमुख वक्ता म्हणून डॉ. दीपक लोणकर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारताच्या संविधान निर्मितीतील योगदान या विषयावर मत मांडले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. उत्तम देऊळकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही विषयक विचार या विषयावर मत मांडले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल सौ. लीना तेलंग यांनी केले तर आभार प्रा. अर्चना भोगेकर यांनी मानले. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद उपस्थित होते.

# राष्ट्रीय सेवा योजना - विशेष शिबीर

## मौजा- करंजी ता- वरोरा जी चंद्रपूर

## (दि. २०/०३/२०२२ ते २६/०३/२०२२)

### i) कार्यक्रम पत्रिका:-

**※ शिबिरातील विविध प्रकल्प ※**

१) विविध प्रकारचे श्रमसंस्कार, रस्ते दुरुस्ती, नाली खोदकाम, बंधारे, शोषखड्डे, सोपा-संडास व स्वच्छता इ.
२) युवा नेतृत्व, महिला नेतृत्व, राष्ट्रीय एकात्मता व सर्वधर्म समभाव यावर भर.
३) लोकशाही संवर्धनासाठी मतदारात जाणीव जागृती.
४) कोरोना महामारी आणि घ्यावयाची दक्षता.
५) स्वतंत्र भारताची ७५ वर्षाची वाटचाल आणि मतदारांचा सहभाग.
६) पर्यावरण व वृक्षसंवर्धन, पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, जलव्यवस्थापन इ.
७) ग्रामस्वच्छता अभियान, गाजर गवत निर्मूलन, प्लास्टिक निर्मूलन, साक्षरता, अल्पबचत, शेतकऱ्यांची आत्मनिर्भरता, लोकसंख्या शिक्षण व महिला सक्षमीकरण इ. वर भर.

**※ शिबिराची दिनचर्या ※**

| | | |
|---|---|---|
| पहाटे ५.०० वाजता | - | जागर |
| सकाळी ६.०० ते ७.३० | - | प्रार्थना, प्रभातफेरी व कवायत |
| सकाळी ७.३० ते ८.०० | - | चहा व नाश्ता |
| सकाळी ८.०० ते ११.०० | - | श्रमसंस्कार |
| दुपारी १२.०० ते १.०० | - | भोजन |
| दुपारी २.०० ते ४.३० | - | बौद्धिक कार्यक्रम |
| सायं. ४.३० ते ५.३० | - | विविध मैदानी खेळ व स्पर्धा |
| सायं. ५.३० ते ६.३० | - | अहवाल वाचन, मनोगत व प्रार्थना |
| रात्री ७.०० ते ८.०० | - | भोजन |
| रात्री ८.०० ते १०.०० | - | समाजप्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रम |
| रात्री १०.०० वाजता | - | दीप विसर्जन |

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**लोकमान्य महाविद्यालय, वरोरा**

जि.चंद्रपूर (महाराष्ट्र) द्वारा आयोजित

**राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर**

आज़ादी का अमृत महोत्सव

**"NOT I BUT YOU"**

**''स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष : मतदार जनजागृती आणि ग्रामीण महिला उन्नतीकरिता युवा शक्ती शिबिर''**

(दि. २० मार्च २०२२ ते २६ मार्च २०२२)

**※ स्थळ ※**

**जि.प.उच्च प्राथमिक शाळा, करंजी**

ता.वरोरा, जि.चंद्रपूर

**कार्यक्रम निमंत्रण पत्रिका**

श्री./सौ. ______________________

______________________ स.न.वि.वि.

टिप :- करंजी हे गांव वरोरापासून दक्षिणेस ७ कि.मी. अंतरावर आहे.

आपणास कळविण्यात अत्यंत आनंद होतो की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत लोकमान्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे विशेष शिबिर **''स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष: मतदार जनजागृती आणि ग्रामीण महिला उन्नतीकरिता युवा शक्ती शिबिर''** या संकल्पनेवर आधारित दि. २० मार्च २०२२ ते २६ मार्च २०२२ या कालावधीत मौजा करंजी, ता.वरोरा, जि.चंद्रपूर येथे आयोजित केले आहे.

या शिबिराचे उद्घाटन **मा.प्रा.श्रीकांतजी पाटील** (अध्यक्ष, लो.शि.सं.वरोडा) यांच्या शुभहस्ते तसेच **मा.श्रीकृष्णाजी घड्याळपाटील** (कार्यवाह, लो.शि.सं.वरोडा), **मा.सौ.सुवर्णरेखाताई पाटील** (सदस्या, महाविद्यालय विकास समिती, लो.म.वरोरा), **मा.डॉ.श्यामजी खंडारे** (संचालक, रा.से.यो.गों.वि.गडचिरोली), **मा.श्री.रविंद्रजी धोपटे** (सभापती, पं.स.वरोरा) यांच्या प्रमुख उपस्थितीत व **मा.डॉ.सुबोधकुमार सिंह** (प्राचार्य, लोकमान्य महा.वरोरा) यांच्या अध्यक्षतेखाली दि. २० मार्च २०२२ रोजी रविवारला दुपारी ३.०० वा. संपन्न होईल.

शिबिर समारोप समारंभ दि. २६ मार्च २०२२ रोजी शनिवारला सकाळी ९.०० वाजता **मा.सौ.प्रतिभाताई धानोरकर** (आमदार, वरोरा-भद्रावती विधानसभा क्षेत्र), **मा.प्रा.श्रीकांतजी पाटील** (अध्यक्ष, लो.शि.सं.वरोडा), **मा.श्री.श्रीकृष्णाजी घड्याळपाटील** (कार्यवाह, लो.शि.सं.वरोडा), **मा.सौ.सुवर्णरेखाताई पाटील** (सदस्या, महाविद्यालय विकास समिती, लो.म.वरोरा) यांच्या प्रमुख उपस्थितीत व **मा.डॉ.सुबोधकुमार सिंह** (प्राचार्य, लोकमान्य महा.वरोरा) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होईल.

शिबिर पूर्वतयारी दि. १९/३/२०२२, शिबिर स्थळाची स्वच्छता व स्वयंसेवक नोंदणी.

या शिबिरात विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

**※ विनीत ※**

**डॉ. तानाजी माने**
रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी
व शिबिर प्रमुख

**डॉ. सुबोधकुमार सिंह**
प्राचार्य,
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा

**डॉ. रविंद्र शेंडे**
रा.से.यो.
सहकार्यक्रम अधिकारी

**सौ. सविता काळे**
सरपंच,
ग्रा.पं. करंजी

**श्री. सुजित कष्टी**
उपसरपंच,
ग्रा.पं. करंजी

**श्री. अरुण पंधरे**
ग्रामसेवक,
ग्रा.पं. करंजी

**श्री. राजेंद्र कुरेकार**
मुख्याध्यापक,
जि.प.उ.प्राथ.शाळा, करंजी

**ग्रामपंचायत सदस्य :-** श्री. राजाराम पारोधे, श्री. मंगेश दाते, सौ. मनिषा कुळसंगे, सौ. संगिता हनमंते, सौ. ज्योत्स्ना डांगे, श्री. निलेश मिलमिले (अध्यक्ष, तंटामुक्ती),
श्री. दिलीप पारोधे(अध्यक्ष, गुरुदेव सेवा मंडळ), जय जगन्नाथ भजन मंडळ, महिला भजन मंडळ,
शारदा महिला भजन मंडळ, गुरुदेव भजन मंडळ, शिवछत्रपती युवा ग्रुप, क्रांती ग्राम संघ व समस्त ग्रामवासी आणि
**लोकमान्य महाविद्यालय, वरोरा समस्त प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद.**

**※ कार्यक्रमाची रुपरेषा ※**

सकाळी ८.०० ते ११.०० श्रमसंस्कार

| दिनांक/वार | बौद्धिक कार्यक्रम<br>दुपारी २.०० ते ४.०० | सांस्कृतिक कार्यक्रम<br>रात्री ८.०० ते १०.०० |
|---|---|---|
| दि. २०/३/२०२२<br>रविवार | शिबिराचे उद्घाटन<br>दुपारी ३.०० वा. | भजन कार्यक्रम<br>भजनी मंडळ, करंजी व रासेयो स्वयंसेवक |
| दि. २१/३/२०२२<br>सोमवार | मा.सौ.सुवर्णरेखाताई पाटील<br>(विषय - ग्राम विकासात महिलांची भूमिका)<br>राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक<br>(विषय - गटचर्चा) | सांस्कृतिक कार्यक्रम<br>रा.से.यो.<br>कलापथक |
| दि. २२/३/२०२२<br>मंगळवार | मा.श्री. विश्वनाथ जोशी<br>(विषय - कंपोस्ट खत निर्मिती)<br>वक्तृत्व स्पर्धा<br>(विषय - लोकशाही संवर्धनासाठी युवकांची भुमिका) | सांस्कृतिक कार्यक्रम<br>जिल्हा परिषद उच्च<br>प्राथ. शाळा, करंजी |
| दि. २३/३/२०२२<br>बुधवार | रोगनिदान शिबीर<br>डॉ. विशाल हिवरकर, बालरोग तज्ञ, वरोरा<br>डॉ. कपिल टोंगे, जनरल फिजीशियन, वरोरा<br>डॉ. आशुतोष झाडे, दंतरोग तज्ञ, वरोरा | गीत गायन<br>रा.से.यो.<br>कलापथक |
| दि. २४/३/२०२२<br>गुरुवार | श्रीमती वंदना बरडे<br>(विषय - कोरोना महामारी व आरोग्य)<br>मा.ॲड्.भावना लीया<br>(विषय - कौंटुंबिक हिंसा आणि कायदा) | समाजप्रबोधनात्मक नकलांचा कार्यक्रम<br>शिवछत्रपती कला प्रबोधन<br>मंडळ, दहेगांव |
| दि. २५/३/२०२२<br>शुक्रवार | मा.सौ.ऐश्वर्या खामनकर<br>(विषय - ग्राम विकासातील महिलांचा सहभाग)<br>मा.तात्यासाहेब धानोरकर<br>(विषय - मधुमक्षिका संगोपन ) | सांस्कृतिक कार्यक्रम<br>रा.से.यो.<br>कलापथक |
| दि. २६/३/२०२२<br>शनिवार | समारोप समारंभ<br>सकाळी ९.०० वाजता. | |

**ii) विशेष शिबीर बॅनर:-**




1) उद्घघाटन कार्यक्रम :-









**1) उद्धघाटन कार्यक्रम अहवाल:-**

लोकमान्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय विशेष शिबीराचे आयोजन दिनांक २०/०३/२०२२ ते २६/०३/२०२२ या कालावधीत मौजा- करंजी ता- वरोरा जी चंद्रपूर करण्यात आले. या सात दिवसीय विशेष शिबीराच्या उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २०/०३/२०२२ रोज रविवारला दुपारी ३:०० वाजता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुबोधकुमार सिंह यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. या उद्घाटन कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून मा.प्रा.श्रीकांतजी पाटील (अध्यक्ष, लोकशिक्षण संस्था, वरोडा) प्रमुख उपस्थिती म्हणून मा.श्री.श्रीकृष्णाजी घड्याळपाटील (कार्यवाह, लोकशिक्षण संस्था, वरोडा) मा.सौ.सुवर्णरेखाताई पाटील (सदस्य, महाविद्यालय विकास समिती,लो.महा.वरोरा) सौ. सविता काळे (सरपंच, ग्रामपंचायत कारंजी) मा.श्री. सुजित कष्टी (उपसरपंच, ग्रामपंचायत कारंजी) इत्यादि मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे उद्घाटक मा. प्रा. श्रीकांतजी पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात रासेयोच्या विशेष शिबिरातून महाविद्यालयातील युवकांना ग्रामीण भागाशी जोडण्याचे कार्य केले जाते, असे मत मांडले. तर प्रमुख उपस्थित असलेल्या मा.श्री.श्रीकृष्णाजी घड्याळपाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयीन युवकांच्या व्यक्तिमत्वासाठी महत्वाचा घटक आहे, असे मत मांडले. तर मा.सौ.सुवर्णरेखाताई पाटील यांनी रासेयो हे विद्यार्थ्यांवर श्रमसंस्कार करण्याचे व्यासपीठ आहे,असे मत मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.सुबोधकुमार सिंह यांनी या विशेष शिबिराच्या आयोजन मागची भूमिका मांडली. या कार्यक्रमाचे सूत्र-संचालन रासेयो सह-कार्यक्रमाधिकारी डॉ. रवींद्र शेंडे यांनी केले, प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. तानाजी माने यांनी केले , तर आभार प्रा. उत्तम देऊळकर यांनी मानले. या उद्घाटन कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, रासेयो स्वयंसेवक आणि कारंजी ग्रामवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सातदिवसीय विशेष शिबिरात महाविद्यालयातील रासेयो एककाचे ७५ स्वयंसेवक सहभागी झाले होते.

**ii) श्रमदान:-**














*या सात दिवसीय विशेष शिबिरात कारंजी या गावातील सांडपाणी व्यवस्थेच्या दृष्टीने नवीन वस्तीत श्रमदानातून नाली खोदकाम करण्यात आले. या श्रमदानात ७५ रासेयोचे स्वयंसेवक आणि कारंजी ग्रामवासीय यांचा सहभाग होता. या श्रमदानातून १४०० मी.- लांब, ३ फूट रुंद आणि २ फूट खोल नालीचे खोदकाम करण्यात आले. या कच्च्या नालीच्या खोदकामाचे ४२००० /- श्रममल्य इतके होते.*

## iii) बौद्धिक कार्यक्रम:-














***बौद्धिक कार्यक्रम:-***


*या सात दिवसीय विशेष शिबिरातील बौद्धिक सत्रात रासेयो स्वयंसेवक आणि करंजी या गावातील ग्रामवासीय विविध विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी तज्ञ् व्यक्तींच्या व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात मा.सौ. सुवर्णरेखाताई पाटील (ग्रामविकासात महिलेची भूमिका), मा.श्री.विश्वनाथ जोशी (कंपोस्ट खत निर्मिती), श्रीमती वंदनाताई बरडे (कोरोना महामारी व आरोग्य), मा.सौ. एश्वर्या खामणकर (ग्राम व्यवस्थेतील महिलांचा सहभाग) ई. सोबतच रासेयो स्वयंसेवकांना व्यासपीठ उपलब्ध यासाठी 'लोकशाहीतील युवकांची भूमिका' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती.*

**iv) रोगनिदान शिबिर:-**










***रोगनिदान शिबिर :-***


*या सात दिवसीय विशेष शिबिरात कारंजी या गावातील आरोग्याच्या दृष्टीने दिनांक २३ मार्च २०२२ रोजी रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या रोगनिदान शिबिरात वरोऱ्यातील डॉ.विशाल हिवरकर (बालरोग तज्ज्ञ, वरोरा), डॉ. कपिल टोंगे (जनरल फिजिशियन, वरोरा), डॉ. आशुतोष झाडे (दंतरोग तज्ज्ञ,वरोरा) या नामांकित डॉक्टरांची सेवा मिळाली. या रोगनिदान शिबिरात करंजी गावातील ८४ रुग्णाची मोफत तपासणी करून त्यांना मोफत औषधाचे वाटप करण्यात आले. या रोगनिदान शिबिरात रुग्णाची तपासणी व औषधाचे वाटप याचे मूल्य १४५००/- इतके होते.*

**iv) सांस्कृतिक कार्यक्रम:-**















***सांस्कृतिक कार्यक्रम :-***

*या सात दिवसीय विशेष शिबिरात रात्री ८:०० ते १०:३० या वेळात समाजातील समस्यांवर जाणीव जागृती करण्यात यावी आणि रासेयोच्या स्ववंसेवकांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात प्रामुख्याने कारंजी गावातील भजनी मंडळ, रासेयो कलापथक, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कारंजी आणि शिवछत्रपती समाज प्रबोधन मंडळ दहेगाव यांच्या वतीने सादर केलेल्या कार्यक्रमाचा समावेश होता.या सांस्कृतिक कार्यक्रमात शेतकऱ्यांची समस्या, व्यसनाधीनता, भोंदू बाबा इ. लघुनाटिका तसेच लावणी, एकल नृत्य, समूह नृत्य, गीत गायन, भजन इ . सांस्कतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.*

**समारोप कार्यक्रम :-**


लोकमान्य महाविद्यालय, वरोरा
राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर
"NOT I BUT YOU"


लोकमान्य महाविद्यालय, वरोरा
राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर
"NOT I BUT YOU"


लोकमान्य महाविद्यालय, वरोरा
राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर
"NOT I BUT YOU"


लोकमान्य महाविद्यालय, वरोरा
राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर
"NOT I BUT YOU"

**समारोप कार्यक्रम अहवाल:-** या सात दिवसीय विशेष शिबीराच्या समारोप कार्यक्रमाचे आयोजन दि. २६/०३/२०२२ रोज शनिवारला सकाळी ९:०० वाजता करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुबोधकुमार सिंह होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून मा. सौ. प्रतिभाताई धानोरकर (आमदार, वरोरा-भद्रावती विधानसभा क्षेत्र), मा. प्रा. श्रीकांतजी पाटील (अध्यक्ष, लोकशिक्षण संस्था, वरोडा), मा. श्री. श्रीकृष्णाजी घड्याळपाटील (कार्यवाह, लोकशिक्षण संस्था, वरोडा) मा.सौ.सुवर्णरेखाताई पाटील (सदस्य, महाविद्यालय विकास समिती,लो.महा.वरोरा) सौ. सविता काळे (सरपंच, ग्रामपंचायत करंजी) मा. श्री. सुजित कष्टी (उपसरपंच, ग्रामपंचायत करंजी) इत्यादि मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती मा. आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात, राष्ट्रीय सेवा योजना हे समाजसेवेचे माध्यम आहे असे मत मांडले. तसेच मा. प्रा. श्रीकांतजी पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात रासेयो हे विद्यार्थी संस्काराचे एक महत्वपूर्ण माध्यम आहे, असे मत मांडले. तर मा. श्री. श्रीकृष्णाजी घड्याळपाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो, असे मत मांडले. तर मा.सौ.सुवर्णरेखाताई पाटील यांनी रासेयो विशेष शिबिरातील दिनचर्याचे पालन स्वयंसेवकांनी नेहमी केले पाहिजे,असे मत मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.सुबोधकुमार सिंह यांनी या विशेष शिबिराच्या माध्यमातून केलेल्या श्रमदानाची माहिती अध्यक्षीय भाषणातून दिली. या कार्यक्रमाचे सूत्र-संचालन रासेयो सह-कार्यक्रमाधिकारी डॉ. रवींद्र शेंडे यांनी केले, प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. तानाजी माने यांनी केले, तर आभार डॉ. श्रीकांत पुरी यांनी मानले. या समारोप कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, रासेयो स्वयंसेवक आणि करंजी ग्रामवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सात दिवशीय विशेष शिबिरात श्रमदानातून १४०० फूट लांबीच्या नालीचे खोदकाम करण्यात आले.

# मूल्य प्रमाणपत्र

कार्यालय

## ग्राम पंचायत करंजी

पंचायत समिती : वरोरा जिल्हा : चंद्रपुर

| | | |
|---|---|---|
| सौ.सविता धनराज काळे<br>सरपंच | श्री.सुजीत देवीदास कष्टी<br>उपसरपंच | श्री.अरुण एम.पंधरे<br>सचिव |

जावक क्रमांक :

दिनांक :

ग्राम पंचायत करंजी

ग्राम पंचायत करंजी

### मुल्य प्रमाणपत्र

ग्राम पंचायत करंजी पंचायत समिती वरोरा जिल्हा चंद्रपुर कडून प्रमाणपत्र देण्यात येते की,लोकमान्य महाविद्यालय वरोराच्या राष्ट्रीय सेवा योजनेचा सात दिवसीय विशेष शिबीर मौजा करंजी गावात दिनांक २० मार्च २०२२ ते २६ मार्च २०२२ या कालावधीत घेण्यात आला.या विशेष शिबिरात खालील कामे केल्याबाबत मुल्य प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१.रोग निदान शिबीर -८४ रुग्ण तपासणी व औषधी वाटप -१४५००

२.नाली खोद काम - लांबी –१४०० -४२०००

रुंदी –३ फुट

खोली – २ फुट

एकूण- **५६५००**

करिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

सरपंच
ग्राम पंचायत करंजी
सरपंच
ग्राम पंचायत, करंजी

सचिव
ग्राम पंचायत करंजी
सचिव
ग्रामपंचायत करंजी